
जगदिश खांदेवाले
भास
आभास

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# भास आभास

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

### पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

### पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# भास आभास

लेखक

## जगदिश खांदेवाले

# भास आभास

## लेखक.. . जगदिश खांदेवाले

फ्लॅट नं ११३ शिवशंकर सोसायटी.
शिवतीर्थ नगर कोथरुड पुणे ४११०३८
मो. नं ९१५८६६१६३८
Email id – jlkhandewale@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com
esahity@gmail. com
Whatsapp: 9987737237
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : ५ नोव्हेंबर २०२१**

**(दिवाळी पाडवा शके १९४३)**



©esahity Pratishthan®202१

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे




उद्यमी, न्याय , अनाहुत आणि पाया रचिता या ई साहित्य प्रतिष्ठानतर्फे प्रकाशित झालेल्या माझ्या चार कादंबऱ्यांना वाचकांनी उदंड प्रतिसाद दिल्याने मी थोड्या वेगळ्या विषयावरील हे पाचवे पुस्तक सादर करीत आहे.

आपल्याला हे पुस्तक आवडेल अशी आशा करतो.

ई साहित्य प्रतिष्ठान चे श्री सुनीळ सामंत व त्यांचे सहकारी यांचे विशेष आभार.



**अर्पणपत्रिका**

माझे नातू

चि. ओजस (वय वर्षे अकरा)

आणि चि. विराज (वय वर्षे चार)

यांच्या सहकार्याशिवाय

मी एक शब्दही लिहू शकलो नसतो….

या कादंबरीतील सर्व घटना, स्थळे व व्यक्ती काल्पनिक असून त्यांचा कोणाही व्यक्ती स्थळ वा घटनेशी साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग मानावा.

# प्रकरण १

अंगरक्षक पाहिजे. प्राधान्य : माजी सैनिक, कमांडो. वयोमर्यादा : 30 वर्षे, निरोगी व उत्साही. चांगला पगार.योग्य व्यक्तीस चांगले भवितव्य, कृपया सर्व माहितीनिशी स्वहस्ताक्षरात अर्ज करा. संदर्भ, ओळख आवश्यक. संपर्क पो.बॉक्स 113.

नीता म्हणाली, ‘‘तू जर पाच मिनिटे पेपर दूर करणार असला तर आपण परत चहा घेऊ.’’

"शक्य नाही, तूच स्वतःपुरता कर आणि घे. उगाच मला ताप देऊ नकोस. मी कामात आहे." आणि मी खरच कामात होतो. चांगला पगार आणि चांगले भवितव्य काय असेल हा विचार करत होतो. तसेच कोणाला आणि का अंगरक्षक पाहिजे असेल याचा विचार करत होतो. मुंबईसाख्या शहरात अशा जाहिराती नेहमी आढळत नाही. चांगला पगार आणि चांगले भवितव्य, दोन्ही मला चालले असते आणखी एक म्हणजे पैशाची गरज नाही असा एकपण दिवस मला आठवत नाही, एक महिन्यापूर्वी मला रेसमध्ये दहा हजार रुपये मिळाले होते पण त्यालासुद्धा आता महिना झाला होता आणि त्यातले फक्त हजार आता शिल्लक होते. म्हणजे

दिवसाला तीनशे या गतीने माझा खर्च होता सैन्यातून बाहेर पडल्यावर माझ्या कमाईचा आलेख नेहमीच वर खाली होत असे. एक महिना वर तर एक महिना खाली. त्यानुसार सध्या आलेख खाली होता. अर्थात हे मी नीताला सांगितले नव्हते. तसे ती शोधून काढेल म्हणा आणि शोध लागल्यावर तरी काय करणार याची पण मला कल्पना होती. सर्व जमा, चेकबुक मला देणार, अजून काय ? आतापर्यंत मी बऱ्याच चांगल्यावाईट गोष्टी केल्या आहेत पण आजवर कधीही कोणत्याही स्त्रीवर अवलंबून राहिलो नाही आणि राहणार पण नाही. नीताला मात्र मी तिच्यावर अवलंबून रहावे असे नेहमीच वाटते. तसे राहिल्याने मी नेहमीच तिच्या अधीन राहीन असे तिला वाटते.माझ्या कमाईचा आलेख चढता असला की तिची काळजी वाढते. खरेतर आलेख घसरला तर काळजी वाटायला पाहिजे. पण ती जरा मंदच आहे. तशी नीता मनानी चांगलीच आहे, दिसायला तर प्रश्नच नाही. मॉडेलिंग करून ती भरपूर पैसे कमावते. स्वतःचा प्रशस्त फ्लॅट आहे. भरपूर बँकबॅलन्स आहे अजून काय पाहिजे? पण विचारांनी मात्र फारच कोती आहे. तिला वाटते की पोपटाला सुंदर पिंजरा दिला, भरपूर खायला प्यायला दिले की झाले. अधूनमधून लग्नाची पण भुणभुण करत असते.

या सर्व कारणांमुळे ही जाहिरात म्हणजे मला एक पर्वणीच वाटत होती. मनातून मला एक जाणीव झाली होती की मी नुसता अर्ज करायचा अवकाश की ही नोकरी नक्कीच मिळेल. तसा अर्ज करून नोकरी करण्याचा हा माझा पहिलाच अनुभव ठरणार होता कारण याआधीच्या नोकऱ्या मला चक्क सांगून येणाऱ्या होत्या. जसे एका कारच्या शोरुममधे महागड्या गाड्या उगीच बघत असतांना एक शोफरची नोकरी मिळाली होती जी मी दोन महिने केली होती. माझ्या नोकऱ्यात पण विविधता होती. ड्रायव्हींग इंस्ट्रक्टर, डॉग ट्रेनर, शोफर वगैरे पण अंगरक्षक म्हणून हा माझा पहिलाच अनुभव ठरणार होता. अंगरक्षक म्हणून काम करायला काही आवश्यक गोष्टी असतात त्या मी सैन्यात असतांनाच आत्मसात केल्या होत्या. मी सशक्त आणि तंदुरस्त आहे.कमांडो ट्रेनिंग केले आहे. माझ्या उजव्या हाताच्या ठोश्याने घोडापण आडवा होऊ शकतो. मी चांगला धावू शकतो, पण म्हणून अंगरक्षकाला हे सर्व करावेच लागते असे मला वाटत नव्हते. माझ्या माहितीतील कितीतरी कुप्रसिद्ध राजकारण्यांचे अंगरक्षक

महिनोनमहिने नुसते त्यांच्या बरोबर फिरण्याचा पगार घेतांना मी बघितले होते.थोडक्यात चांगला पगार पाहिजे असल्यास, अर्ज करावा या निर्णयाप्रत मी आलो होतो.

"पवन, तुला झाले तरी काय ? दोन तास झाले तू गप्प बसून आहे."

"काही नाही. कसल्या विचारात आहे असे तू म्हणायला पाहिजे."

“तरीपण तू काय पूर्ण संध्याकाळ गप्प बसणार आहे का ? तू कसल्यातरी काळजीत आहे. खरे ना ? उगीच नाकारू नकोस. मला असली लक्षणे कळतात.”

“कसली लक्षणे ?”

“ नेहमीची. एकतर कपाळावर आठ्या आहेत आणि सारखी नखे खातोय. परत तू म्हणशील की मी टोमणे मारते पण ही नखे खायची सवय सोड. वाईट दिसते.”

“बस, या दोन गोष्टींवरुन तुला वाटते मी काळजीत आहे?”

“ मला माहिती आहे,एवढेच."

“स्त्रीसुलभ तर्क, अजून काय ? उगीच तर्कट चालवू नकोस.”

“ मला कळत नाही की गेले काही दिवस तुला झाले तरी काय ? एकतर माझ्याशी अजिबात बोलत नाही. मी काहीही म्हटले तरी तू कुजकट बोलतोच. माझी तुला काही किंमतच नाही.”

हे ती रोज मला दिवसातून नवू हजार नऊशे नव्याणव वेळा ऐकवतेच.

“बर बाई, तुझ खर. मी काळजीत आहे हे तुला कळते, मग तर झाले."

“ पवन, आपण उगीच भांडायला नको त्यापेक्षा आपण जेवू.”

“मी भांडत नाही, पण तुला असे का वाटते की तू जे काही माझ्या करता करते त्याचे मला काहीच वाटत नाही म्हणून ?”

आपल्या अंगावर उगाच गुरगुरण्याऱ्या कुत्र्याकडे आपण जसे बघतो तशी ती माझ्याकडे बघत राहिली.

“तुला जाणून घ्यायचे आहे की मी कसल्या काळजीत आहे ? मी सांगतो. खरे म्हणजे सकाळपासून सांगायचा मी प्रयत्न करत आहे. मी परत कफल्लक झालो आहे. आता या घडीला माझ्याजवळ फक्त हजार रुपये आहेत आणि मी या पेपरमधल्या जाहिरातीतील ही नोकरी मिळवणार आहे.”

मी तिला पेपर दिला, “ खूण केलेली जाहिरात वाच. एखादा शब्द अडला तर विचार.”

ती शांतपणे वाचू लागली. मी तिच्या प्रतिक्रियेची वाट बघू लागलो. पूर्ण वाचल्यावर पण ती शांतच होती. शेवटी मीच न

राहवून म्हणालो," बोल. मला तर ही नोकरी माझ्या आवाक्यातली वाटते."

“अर्ज करू नकोस, पवन, मला हे सर्वच धोकादायक वाटते.काही धोका नसेल तर उगीच कोणाला अंगरक्षक कशाला पाहिजे असणार ?"

“असेल कोणी अभिनेता, मला काय फरक पडणार आहे? पण तुला का तसे वाटते ?"

“उगीच कोण खाजगी अंगरक्षक ठेवेल ? पोलीस कशाकरता आहेत ?”

“मला वाटते तेवढी काही तू बुद्दु नाही.”

“ पवन,तिरकस बोललेच पाहिजे का ?”

“ तिरकस नाही, खरच तू म्हणते त्यात तथ्य आहे. हा जो कोण असेल तो पोलिसांकडे जाऊ शकत नसेल, पण नक्कीच धनाढ्य असणार. मला पण आता थोडेथोडके नको चांगले मोठे घबाड पाहिजे आहे. आतापर्यंत जे काही मी सरळमार्गाने कमावले ते सर्व मायबाप सरकारने टॅक्समध्ये वसूल केले. आता हाच मला अखेरचा मार्ग दिसतो ज्यात सरकारची लुडबुड अजिबात नसणार."

“ पवन, जरा ऐक, रॅकेट करून कितीही मिळाले तरी शेवटी पोलीस पर्दाफाश करणारच. त्यापेक्षा आपण आहे तसेच बरे आहोत.”

“सॉरी, भरपूर हात मारल्यावर आपण कोणत्याही देशात जाऊ, अमेरिका, क्युबा अगदी इस्रायल

पण.” आणि मी अर्ज लिहू लागलो.

----------------------*----------------------

# प्रकरण २

तीन दिवसांनी मी ज्याची वाट बघत होतो तो लिफाफा आला. सकाळी नऊचा सुमार असेल. नीता आणि मी न्याहारी घेत होतो. एकूण तीन पाकिटे होती. दोन नेहमीप्रमाणे बिल होती. तिसरे हेच असणार. मी बिले नीताकडे सरकवली व हळूच तिच्याकडे बघितले. का कोण जाणे मला पाकिटे उघडावयाची अजिबात घाई करावी वाटली नाही. मग नीतानेच आठवण करून दिली.

“ पवन, तुझे पाकीट दिसते."

“ उघड तूच.”

“ नको. परत तूच म्हणशील का उघडले ? पण कसले आहे?”

“ अग, तेच म्हणालो नाही का अंगरक्षकाच्या नोकरीबाबत, त्याचे उत्तर असेल !”

“म्हणजे तू अर्ज केलाच."

“होय, बघू तरी काय आहे ."

पाकीट एकदम साधारण होते. आतला कागद पण, कोणताही मोनोग्राम, फैक्स, फोन नंबर अशी कोणतीही श्रीमंती लक्षणे नव्हती.एवढेच काय, टाईप पण केले नव्हते. कोणताही फापटपसारा न लावता बारा वाजता मुलाखतीला बोलावले होते तसेच येताना ओळख, संदर्भ आणायला आवर्जून सांगितले होते.

“ नीता, एखाद्याची ओळख असल्याचे पत्र मिळेल?”

“त्याचा काय उपयोग? इतक्या कमी वेळात तर कठीणच आहे."

“ बरे,राहू दे.”

"म्हणजे तू काही एवढा सिरियस नाही ?”

“खरे आहे.”

विषय तेवढ्यावरच संपला.

राकेश एन्टरप्राईझेस या कंपनीचे ऑफिस नायडू रोडवर एका जुन्यापुराण्या इमारतीमध्ये होते. त्या इमारतीत लिफ्टपण नव्हती. सगळीकडे पोल्ट्री फार्ममध्ये येतो तसा वास येत होता, जिन्याचे कठडे पण धुळीने भरले होते. मी तसाच चार मजले चढून वर गेलो. एका अंधाऱ्या कॉरिडॉरच्या शेवटी ते ऑफिस मला सापडले.माझा मलाच राग येऊ लागला होता. प्रत्येक मजल्यागणिक मला माझे

श्रीमंतीचे स्वप्न दूर जात असल्याचे भासू लागले. हा काहीतरी प्रॅक्टिकल जोक सारखा प्रकार असावा असे मला वाटू लागले.

मी सरळ दार उघडून आत प्रवेश केला.ऑफिस बघितल्यावर वर हा प्रॅक्टिकल जोक असण्याची माझी शंका अजून बळावली. खिडक्यांना साधे पडदेपण नव्हते. फक्त एक टेबल व खुर्ची होती आणि एक सेक्रेटरी काहीतरी जोरजोरात टाईप करत होती. सेक्रेटरी वीस किंवा चाळीस यापैकी कोणत्याही वयाची वाटत होती. ती लठ्ठ आणि कुरुप होती. भरीस भर म्हणजे तिला जाड काचेचा चष्मा होता. पण या सर्वांवर मात करणारी एक गोष्ट तिच्याजवळ नक्कीच होती. ती म्हणजे तिची नजर. नीता आणि तिच्या नजरेची जर तुलनाच करायची असली तर मांजर आणि वाघीण यांच्या नजरेतील फरक असाच करावा लागेल. अशीच जर सेक्रेटरी असेल तर तिला हॅंडल करणारा बॉस दसपट हुशार असेल. मला परत स्वप्न पडायला लागले. मी पत्र तिच्यासमोर टाकले.

“ बरोबर बारा वाजले आहे आणि मी आलो आहे."

तिने ते पत्र पहिल्यांदाच बघत असल्यासारखे बघत चष्म्यापासून सहा इंच दूर धरले. एका जुन्या खुर्चीकडे हात दाखवत म्हणाली, "बस."

हात दाखवितांना तिच्या बोटातली अंगठी व त्यातला हिरा चकाकला. त्याक्षणीच मला खात्री पटली की मी योग्य जागी पोचलो आहे कारण एवढा किंमती हिरा मी आयुष्यात पाहिला नव्हता.’बस, मी बघते मि. राकेश रिकामे आहेत की नाही ते ’ असे ती म्हणाली पण तिने आत जाऊन सांगायला अजिबात घाई केली नाही. प्रथम तिने ती करीत असलेली आकडेमोड पूर्ण केली, पत्र परत वाचले व माझ्याकडे नीट बघितले. एव्हाना मी खुर्चीत विसावलो होतो. थोडया वेळाने ती केबिनमध्ये गेली.

मी आतापर्यंत बऱ्याच लठ्ठ व्यक्ती बघितल्या आहेत पण ही सर्वच बाबतीत भारी असेल. त्यातूनही शरीराच्या मानाने तिचे पाय सुंदर होते. साधारणपणे ती दहा मिनीटांनी बाहेर आली व तिने मला आत जाण्याची खूण केली.

मी आत गेलो. आतल्या व बाहेरच्या खोलीत फारसा फरक नव्हता. मध्यभागी एक जुने टेबल होते व खुर्चीत एक काळसर, लहानखुरा माणूस बसला होता. टेबलाच्या डाव्या बाजूला एक रिकामी खुर्ची होती व त्या खुर्चीत एक कोट पडला होता. हॉरिबल, हा एकच शब्द त्या कोटाला योग्य होता.

तो पूर्ण गडद जांभळ्या रंगाचा होता आणि त्यावर लालभडक तीन इंची चौकोन होते. हे सर्व कमीच होते की काय म्हणून त्याच्या

खिशाचे फ्लॅप चक्क हिरव्या रंगाचे होते. हा असला कोट वापरणारा नक्कीच पागल असला पाहिजे याची मला खात्री वाटू लागली.

“ ये पवन " तो म्हणाला. त्याचा आवाज त्या बाहेरच्या लठ्ठंभारतीसारखाच किरकिरा होता.

"तुला हा कोट आवडलेला दिसत नाही. मला पण आवडत नाही पण बस, थोडा रिलॅक्स हो, मग आपण त्यावर बोलू.” येवढे ज्याला कळते तो माणूस नक्कीच पागल नसणार असा विचार मनात आणून मी खुर्चीत विसावलो.

" मी या ऑफिसमध्ये तीन वर्ष काढलीत आणि आतापर्यंत माझे आठ कोट चोरीला गेलेत म्हणून मी हा असला विचित्र कोट घेतला. मला स्वतःला पण हा आवडत नाही पण काय करू मला पटकन सर्दी होते. विनाकोट जर जाणेयेणे केले तर मला कायमचीच सर्दी होईल. म्हणून हा इलाज." तो म्हणाला,

" आणखीन एक फायदा म्हणजे धंद्यातले सगळी लोक मला याच्यामुळेच ओळखतात. नायडू रोडवर हीच माझी खूण झाली आहे.शेवटी धंदा आहे बाबा."

मी मनाशीच विचार केला की असा कोट घालून जर धंदा होत असेल तर धंदा नक्कीच फायदेशीर असणार.

तो किंचित हसला आणि म्हणाला ,"मोठया शहरात राहण्याचा एक फायदा असतो. आपल्याला कोण काय म्हणेल याची चिंता नसते."

“होय ." आता मी जरा निश्चिंत झालो.हा माणूस विक्षिप्त असेल पण वेडा तर नक्कीच नाही. तो काळा तर होताच, चेहरापण काही लक्षात घेण्यासारखा नव्हताच, फक्त ठळक खूण म्हणजे तो पोपटनाक्या होता, पूर्णपणे टक्कल होते आणि कानावर केस होते.

एकंदरीत त्याची गणना कुरूप म्हणूनच झाली असती जर तुम्ही त्याचे डोळे व नजर याकडे दुर्लक्ष केले तर. त्याच्या काळयाशार डोळयात एक विलक्षण कठोर झाक होती. एखाद्या व्यक्तीचा खून करून त्याच व्यक्तीच्या अंत्ययात्रेत शांतपणे सामील होणारा माणूसच अश्या नजरेचा धनी असू शकतो. कोटीचा व्यवहार करुन चक्क बसनी घरी जाणारी व्यक्ती म्हणजे हीच .माझी खात्री पटली की हे गबाळे ऑफिस म्हणजे फक्त एक देखावा आहे. मी योग्य जागी पोचलो होतो. माझा अर्ज समोर ठेवून त्याने बरेच प्रश्न विचारले. माझी उत्तरे तो माहितीशी ताडून बघत होता.

अचानक त्याने विचारले, “तू तुरुंगात होतास याचा यात काही उल्लेख नाही ?”

एक मिनिट मला काय उत्तर द्यावे हे सुचले नाही.

“पण त्याला चार वर्षे झाली आणि असल्या गोष्टी काही उघडपणे सांगायच्या, लिहायच्या नसतात.”

“ तू दारु पिऊन ड्रायव्हींग करत होतास आणि एक जोडपे तुझ्याकडून ठार झाले."

“ हो. पण त्यात माझी काहीच चूक नव्हती. चार वर्षे मी त्याची शिक्षा भोगली आहे.”

“ दारू पिऊन गाडी चालवणारे लोक माझ्या अंगावर काटा आणतात."

"परत असे होणार नाही याची मी तुला खात्री देतो, "

त्यानी परत त्या थंडगार भेदक नजरेनी माझ्याकडे पाहिले, "असे असले तर. "

मी गड सर केल्याचे मला जाणवले. अजून खुंटा बळकट करण्यासाठी मी म्हणालो, " राकेश, निरर्थक ओळख दाखवणारी पत्र मी मुद्दामच आणली नाहीत, हेही सांगतो की मी कधीही अंगरक्षकाचे काम केले नाही पण त्याच बरोबर ही पण खात्री देतो की मी कमी पडणार नाही . माझ्यासारखा अंगरक्षक तुला मिळणे असंभवच नाही तर अशक्य आहे." त्याचे डोळे क्षणभर चमकले,

“आता मुख्य, पगार ?”

“ जो द्याल तो आणि एक महिन्यानंतर.”

"ठीक आहे." तेवढ्यात ती जाडी काही पत्रे घेऊन आत आली. आशा, हा पवन,माझा नवा अंगरक्षक आणि पवन, ही ही आशा, माझी सेक्रेटरी. मी तिच्याकडे नावडीचा एक कटाक्ष टाकला. भविष्यकाळात ती माझे काय करणार आहे याची मला थोडीतरी कल्पना असती तर मी तिच्याशी नक्कीच नीट वागलो असतो.

----------------------*----------------------

# प्रकरण ३

" मिळाली नोकरी ?"

"अर्थातच, खात्री नसती तर मी गेलोच नसतो."

" ठीक आहे. मग केव्हापासून बोलावले आहे ?"

"आज संध्याकाळी सहापासून .सॉरी मला त्याच्या बरोबर चोवीस तास राहणे भाग आहे."

"म्हणजे तू इथून जाणार ?"

" इलाज नाही."

"पण तो माणूस कोण आहे, त्याला एवढी अंगरक्षकाची गरज का आहे, त्याचा धंदा काय आहे ?"

"अग, हो, हो. एकदम किती प्रश्न, तो एक हिऱ्यांचा व्यापारी आहे. त्याच्याजवळ एक बटबटीत पिवळा कोट आहे. शिवाय तो अगदीच गिधाडासारखा दिसतो. धंदा अजून कळला नाही पण छुपा असावा. छुप्या धंद्यात अंगरक्षक हवाच. नाही का?"

"पवन, अजूनपण विचार कर. जायलाच हवे काय?"

" म्हणजे काय? ही काय माझी बॅगपण भरून झाली. "

“मग मी तुझ्या शिवाय काय करु?" हीच रडारड मला नको होती, नीताची घालमेल मला कळत होती.

“अग वेडाबाई, जमेल तसा मी येईनच. आता जरा शहाण्यासारखी मला चहा करून दे बर.”

नीता चहा करण्याकरीता आत जाताच मी बाहेर पडलो.

संध्याकाळी सहा वाजता मी परत राकेशच्या ऑफिसमध्ये हजर झालो. आशा जोरजोरात टायपिंग करत होती. तिची बोटे कीबोर्डवर स्टेनगनसारखी चालत होती.

"थोडा वेळ थांब. राकेश मिटिंगमध्ये आहे ." हिच वेळ होती तिला दाखवायला की मी ऑर्डर्स राकेशकडून घेणार तिच्याकडून नाही. मी सरळ आत घुसलो. ऑफिस पूर्ण सिगारेटच्या धुराने भरले होते. राकेशसमोर एक कोल्हासारखे तोंड असलेला माणूस बसला होता. दोघांच्यामध्ये टेबलावर हिंरे पडले होते. मला बघताच तो माणूस उठला.उणापुरा पावणेसहा फूट उंच असेल तो. काही गरज नसतांना त्याने मला एक ठोसा मारायला हात उगारला. त्याचा हात माझ्या चेहऱ्याजवळ पोचण्यापूर्वीच माझा सुप्रसिद्ध ठोसा त्याच्या नाकावर बसून तो कोपऱ्यात जाऊन पडला.

"राकेश, तुझ्या मित्रांना जरा समजावून सांग, उगीच ठोसेबाजी करू नका म्हणाव."

त्यानंतर आयुष्यात मी कधीही हिरे बघितले नाहीत. आपला मित्र शुद्धीवर यायच्या आत

निघायची राकेशला घाई होती. त्याने मला गाडी आणायला पाठवले. मी गाडी मुख्य गेटपाशी आणली. राकेशची गाडी म्हणजे जुनी पुराणी फियाट होती. तिची दशापण ऑफिससारखीच होती. वर्षापूर्वी तिला पुसली असेल तर असेल. ड्रायव्हरची सीट जरा ठीक होती. बाकीच्याचा स्पंज निघाला होता.

" अमरबाग , दलपत रोड " राकेश म्हणाला. हा तर एकदम उपनगरातला भाग, अविकसित म्हणाला तरी चालेल. तरीपण मला राकेश कोट्याधीश असल्याची खात्री होती. कारण आशाच्या हातातली हिरेजडित अंगठी ! कितीही दामटली तरी कार सत्तरच्यावर जायला तयार नव्हती.

" राकेश,तू नवीन कार घ्यायला पाहिजे."

"हिच्यात काय वाईट आहे."

“आपण हीच वापरणार आहे काय? तसे असेल तर मी जरा ठीक-ठाक करून आणतो ."

“काही गरज नाही, काय करायचे ते शनिवारी कर.”

“यापेक्षा आपण लोकलनी लवकर पोचू !”

“मला घाई नाही." एव्हाना आम्ही शहरातल्या गर्दीबाहेर आलो होतो.अचानक तो म्हणाला, “ तू रमणला चांगलेच लोळवले, पण चूक तुझी होती."

“असेल. मी काय म्हणून त्याचा मार खावू ?”

“ तेही खरेच म्हणा. पण झाले ते चांगलेच झाले. ही गोष्ट सगळीकडे होईल आणि मला त्याचा फायदाच होईल !” “तू फक्त, आशाला मला काही ऑर्डर देऊ नको एवढेच सांग."

“बॉस मी आहे, आशा नाही."

“मग ठीक आहे .”

थोडावेळ दोघेही काहीच बोललो नाही. नंतर तोच म्हणाला, “ला मी सांगेन, पण माझ्या बायकोची गोष्ट थोडी वेगळी पडते. तिला या घटनेबद्दल काही सांगू नकोस."

“मला काय करायचे आहे."

“नाही, ती उगाच काळजी करते म्हणून सांगितले.”

ती पण आशासारखीच लठठंभारती नसो. मी मनात म्हणालो.

“नाही म्हणजे मला एवढयात तीन धमक्यांची पत्रे मिळाली तेव्हापासून ती सारखी काळजीत असते म्हणून सांगितले.”

असे आहे. तर, म्हणून अंगरक्षक पाहीजे. मग बरोबर आहे.

“राकेश, ती पत्र मला बघायला मिळतील ?”

“हो घरी गेल्यावर देतो.”

एव्हाना एअरपोर्ट मागे गेला होता. फार्महाऊसेस दिसू लागली होती. त्यातल्याच शेवटच्या फार्महाऊसजवळ पोचताच राकेश म्हणाला, " हेच ते सायंतारा.”

रात्रीच्या अंधारात नीटसे दिसत नव्हते.मी गेटपाशी थांबलो, उतरून गेट उघडले.

“गॅरेज डावीकडे आहे.” असे म्हणून तो घरात गेला. मी गाडी गॅरेजमध्ये लावली, लाईट बंद करतांना तो कोट परत चमकलाच. घर जुने पुराणे व दुमजली होते, अर्थातच कुरूप. हॉलमध्ये लाईट लागल्याचे दिसले. मी आत जाण्याकरता थोडा जास्तच वेळ घेतला म्हटले मी आल्याचे बायकोला सांगण्यासाठी राकेशला थोडा वेळ देऊ या.

मी सुटकेस घेऊन आत गेलो. राकेश एकटाच होता, “ये तुला तुझी खोली दाखवितो .”

मी त्याच्या मागे गेलो. जिना चढल्यावर चार खोल्यानंतर तो थांबला आणि म्हणाला, “ रुम साधीच आहे."

साधी नव्हे, रुम लहान होती.एक कॉट, खुर्ची, टेबल, अजून काय? काही नाही.

“माझा साध्या राहणीमानावर विश्वास आहे," राकेश.

“माझा नाही .” मी अर्थात मनात.

“आवडली नाही ?"

“ दुसरी सोय होईपर्यंत चालेल.”

“ तू आरामात रहा, मजेत रहा.”

“ऐकायला बर वाटत .”

“ती म्हणते तुला दुसरी रुम नाही द्यायची."

“का, बाकीच्या चांगल्या आहेत म्हणून ?"

“नाही, ही गेस्ट रूम आहे.”

“जाऊ दे, राकेश.”

“थोडा तुमचा परिचय वाढला की तिच तुला आग्रह करेल.या बायका म्हणजे

तुला तर कल्पना असेलच.”

“जरा लवकरच परिचय वाढला तर बरे होईल.”

माझ्या लक्षात आले की राकेशला ही जुगलबंदी काही आवडत नाही आहे म्हणून मी विषय बदलला.

“मला वॉशरूमला जायचे आहे !”

“जरुर जा. फ्रेश हो.”

“आणि हो, माझ्या जेवणाचे काय ?”

“माझ्या बरोबरच, दहा मिनिटांनी ये.”

“कुठे किचनमधे ?" त्याला प्रश्न न आवडल्याचे मला जाणवले.

“नाही रे बाबा. आमच्या बरोबरच, डायनिंग रुममध्ये."

“तुझ्या बायकोला ते चालेल का?”

“हे असले बोलणे मला आवडत नाही."

“बरोबर आहे. पण माझ्यामुळे तुमच्यात भांडण नको म्हणून विचारले.”

त्याने माझ्याकडे जरा चिडक्या नजरेने बघितले व तो डायनिंग रूमकडे गेला.

थोडावेळ मी आजूबाजूचे निरीक्षण केले. आजूबाजूच्या तीनही प्रशस्त रूम बघितल्या. मी त्यातलीच एक लवकरच वापरणार होतो.

----------------------*----------------------

## प्रकरण ४

दहा मिनिटांनी मी डायनिंग रूममध्ये गेलो. थंडी जरा जास्तच होती. डायनिंग रूम व हॉल एकत्रच होते. जुन्या पद्धतीचे घर होते. राकेश अर्थात जुनी गोष्ट बदलणार नव्हता. तेथील नजरेत भरणारी सर्वात मोठी वस्तु म्हणजे तिथे असणारा डायनिंग टेबल.चौदा लोक आरामात बसू शकतील असा सुंदर महोगनी लाकडाचा तो टेबल होता. तो बघितल्यावर माझी परत एकदा खात्री पटली की राकेश चांगलाच गब्बर आहे पण दाखवत नाही. टेबलाच्या एका कोपऱ्यात राकेश बसला होता.

“ ये, पवन. माझी बायको फार सुगरण आहे.”

“असणारच.”

समोर तीन माणसाकरिता ताटे वाढलेली दिसत होती. एक ताट जरा दूरच वाढलेले दिसत होते. नवागताचे इथे स्वागत नव्हते हे सुचकतेने दाखविले होते.

“ मी कुठे बसू?”

"बस इथे.” त्याने चमच्यानेच जवळचे ताट दाखवले.

“मॅडमकरता थांबायचे?” मी विचारले.

“ तिला वेळ आहे. आपण सुरु करू या." जेवण खरच छान होते. मी त्याला तसे सांगितले. त्याला आनंद झाल्याचे स्पष्ट दिसत होते.

“अरे सर्व घरचेच आहे.”

"जेवण सुरेखच आहे." मी म्हणालो. तेवढयात दार उघडले व ती आली.तो क्षण मी जन्मात विसरणार नाही. बरे,वाईट, चांगले असे अनेक क्षण मी अनुभवले आहेत पण डोके गरगरणारा तो क्षण विसरणे केवळ अशक्य. नुसते तिला बघितल्यावरच माझे रक्त गरम झाले, जसा काही दोनशे व्होल्टचा झटका बसल्याप्रमाणे वाटले. काही क्षणापूर्वी मी फक्त जेवणावर ताव मारण्याचा विचार करत होतो पण आता मात्र माझ्यातला पशु जागा झाल्याचे मला जाणवले.आकर्षक कमनीयता आणि सुरेख डोळे, एवढे सोडल्यास तिच्यात उत्तेजित होण्यासारखे काही नव्हते. तिला फार उंच म्हणता आले नसते आणि तिचे केस तांबूस होते. त्या तांबूसपणाला एक विशेषच लकाकी होती, तिचे डोळे निळे असून त्यामुळे तिच्या चेहऱ्याला विशेषच गोड़वा आला होता. तिला बघताच नीताची मूर्ती माझ्या मनातून वितळायला सुरवात झाली. तिच्यामध्ये नक्की असे काय होते की त्यामुळे माझी अशी अवस्था झाली हे सांगणे

कठीण आहे पण असे झाले खरे. एकाएकी माझी खाण्यावरची वासनाच उडाली. कसेबसे जेवण झाल्यावर राकेशनी माझी ओळख करून दिली. एक तिरस्कारयुक्त कटाक्ष टाकण्यापलीकडे तिने लक्षपण दिले नाही. जेवणाच्या आनंदापुढे राकेशचे कशाकडेही लक्ष नव्हते.

“ तुला बुद्धिबळ खेळता येते ? रीटाला येत नाही.”

“ थोडेफार, खेळायचे काय?"

“ हो, दोन डाव टाकू.” त्याने आतल्या खोलीतून एक सुरेख हस्तिदंती बुद्धिबळाचा पट आणला.

“वडिलोपार्जित आहे.”

"वाटतोच आहे.” माझी अवस्था त्याच्या लक्षात येऊ नये म्हणून तो सोंगट्या काढत असतांना मी खिडकीपाशी जाऊन बाहेर बघू लागलो.

"चल सुरु करुया .” तो म्हणाला. तेवढयात लाईट गेले आणि दार उघडून ती आत आली व रागात म्हणाली, “ लाईट बोर्ड दुरुस्त करायला सांगून महिना झाला. सारखा फ्यूज जातो .”

“ उद्या करतो. आता तूच फ्यूज बदल ”

“छान, घरात दोन पुरुष असतांना मला फ्यूज बदलावा लागणार.”

“ राकेश, मी बदलतो."

राकेशने एकदा माझ्याकडे निरखून पाहिले. आशाचे पण न ऐकणारा हा, आता याला काय झाले असे त्याला कदाचित वाटले असेल, त्याकडे विशेष लक्ष न देता मी तिच्या मागे स्विच बोर्डपर्यंत गेलो. तिथे बोर्डाकडे बोट दाखवून ती काही म्हणायच्या आत मी तिचा हात पकडला व तिला माझ्याकडे ओढले.तितक्याच जोराने तिने तिचा हात सोडवून घेतला.

“ तुझा सर्व खटाटोप कशाकरता चालला आहे हे मी पूर्ण जाणून आहे.” ती हिंस्त्रपणे म्हणाली. मी मुकाट्याने फ्यूज बदलला.

"चेकमेट" राकेश म्हणाला. मी खुर्चीतून उठलो. खुर्ची मागे सरकवली. नंतर तो मला म्हणाला, "असे खेळल्यावर काय होणार? तुझे खरे तर खेळात लक्ष नव्हते. तू यांत्रिकपणे खेळत होतास. पण तू याहून चांगला खेळू शकतोस.” राकेश म्हणाला. खरे कारण सांगीतले तर याची काय अवस्था होईल मी नेहमीप्रमाणे मनातल्या मनात म्हणालो.

“बर राकेश, मी जरा घराभोवती चक्कर टाकून येतो."

“त्याची काही गरज नाही.”

“लक्षात ठेव, मी तुझा अंगरक्षक आहे. मला माझे काम करू दे.”

“ ठीक आहे. मी आता झोपतो.”

“ रीटापण या वेळेस झोपते ?"

“नाही. ती वाचत बसते. विचित्रच सवय आहे नाही ?”

“ खरे आहे .” असे म्हणून मी बाहेर पडलो.

बाहेर थंड वारा होता. घर आणि परसदारामागील अडगळीच्या खोलीवरून नोकरांच्या खोलीकडे जाणारा लहानसा रस्ता एकदम सुनसान होता. मी त्या वाटेवरून एक फेरी मारायचे ठरवले. अजून वरच्या मजल्यावरच्या खोलीत उजेड दिसत होता. खिडक्या मोठ्या होत्या आणि त्यांना पडदेपण नव्हते. राकेश त्याच्या खोलीत बसल्याचे स्पष्ट दिसत होते. तिच्या खोलीच्या खालीच एक तकलादू शेड होती तसेच एक शिडीपण होती. मी थोड़े जुगाड करून शिडी तिच्या खिडकीपर्यंत येईल अशी ठेवली. चक्कर पूर्ण झाल्यावर मी परत एकदा बघितले. तिच्या खोलीत उजेड होता. अजिबात आवाज न करता मी शिडीवर चढलो आणि खिडकीतून बघू लागलो. सैन्यात असतांना तासन् तास दबा धरून

बसायची मला सवय होती. मी आसपास असून तिच्यावर लक्ष ठेवत आहे अशी तिला जाणीव झाली असावी अशी शंका मला चाटून गेली. ती ड्रेसिंग टेबलाजवळ केस विंचरत बसली होती. पाच मिनिटे ती तेच करत होती. तेवढ्यात राकेश आत आला व जोरजोरात हातवारे करून रागाने काहीतरी बोलू लागला. बहुधा माझ्यासंबंधीच बोलत असावा. तिने काहीही उत्तर दिले नाही. पाच मिनिटानंतर राकेश आला तसा गेला आणि तिने दिवा बंद केला.

----------------------*----------------------

## प्रकरण ५

नंतरचा आठवडा माझा दिनक्रम नियमित होता. बरोबर सकाळी आठ वाजता मी राकेशला नायडू रोडवर त्याच्या ऑफिसला घेऊन जात असे व संध्याकाळी सहाला सायंताराला घरी आणत असे. दिवसभर तो म्हणेल तिथे मी त्याच्याबरोबर जात असे. रात्री बुद्धिबळ खेळत असे. तसेच फार्म हाऊस व घराभोवती पहारा देत असे. माझा मुक्काम अजूनही त्या लहान खोलीतच होता. मला कल्पना होती की माझे येथील वास्तव्य रीटाला आवडत नव्हते. हे पण खरे होते की राकेशवर तिचा इतका प्रभाव नक्कीच होता की ती मला पाच मिनिटात घराबाहेर काढू शकली असती. पण ती तसे करत नव्हती, बहुतेक ती काहीतरी खुसपट काढण्याच्या विचारात असावी. उगाच तक्रारीला जागा नसावी म्हणून मी किरकोळ घरगुती कामे जसे खिडक्यांच्या काचा पुसणे वगैरे स्वतःहून करू लागलो. मी हे करण्याची गरज नाही. त्याकरता वेगळे नोकर आहेत हे राकेशने बऱ्याच वेळा सांगितले, पण मी लक्ष दिले नाही. एक दिवस त्याने ती धमकी देणारी पत्रे मला दिली. अगदीच बालिश होती. मला तर त्यात घाबरण्यासारखे काही

वाटले नाही. फक्त म आणि व अस्पष्ट होते. या आठवड्यात मला राकेशची थोडी अजून ओळख झाली. तसा तो मनानी वाईट माणूस नव्हता. त्याला मुलगा, पैसा आणि बुध्दिबळ हाच क्रम फार प्रिय होता. त्यापैकी पैसा आणि बुध्दिबळ त्याच्यापाशी होते आणि मुलाची त्याला आशा होती. तो कसला धंदा करतो याचा मला नीटसा अंदाज अजूनही आला नव्हता, त्याच्याबरोबर दिवसभर फिरतांना पण तो मला कायमच बाहेर थांबायला सांगायचा. तो लहानसहान दुकानात जायचा व येतांना कधी कधी छोटेसे पार्सल, एखाद्यावेळी सुटकेस पण बरोबर आणायचा. आणि गाडीत मागे ठेवायचा . तेच सामान तो शहराच्या दुसऱ्या भागात लहानसहान दुकानात पोचते करायचा. बहुतेक काळाबाजाराचा प्रकार असावा पण रीटाप्रमाणे या बाबतीत मी धीराने वागायचे ठरवले. एकदा पूर्ण विश्वास संपादन झाला की बघू असेही मला वाटले. तिकडे ऑफिस पूर्णपणे आशाच सांभाळायची. तिची राकेशवरची निष्ठा वादातीत होती. अंगरक्षक ठेवण्याबद्दलही तिनेच त्याला सुचविले होते. म्हणजे चित्र ऐवढे स्पष्ट दिसत असतांना मी आंधळ्यासारखा वागत होतो. मी त्याचवेळी तिच्याशी थोडा नीट वागलो असतो तर आज ही वेळ आली नसती. मी नेहमीच तिचा तिरस्कार केला. मी तिची बाह्यरूपावरून परीक्षा केली पण तिची तीक्ष्ण बुद्धी लक्षात घेऊन मी तिच्याशी नीट वागायला पाहिजे होते.

साहजिकच ती पण माझ्याशी तिरस्कारानीच वागत होती. पाणउतारा करण्याची एकही संधी ती सोडत नव्हती. मी पण माझ्या गुर्मीत होतो. सर्वकाही मी एकटाच निभावून नेईल असे मला वाटत होते. इकडे रीटाशी माझे बिनसले होते. राकेशशी चांगलेच जमले होते त्यात प्रमुख वाटा बुध्दिबळाचा होता. सैन्यात असतांना तीन महिने मी रशियात खास सरावासाठी गेलो होतो. संयुक्त सराव असल्याने माझ्याबरोबर जो रशियन जोडीदार होता तो ग्रँडमास्टर होता. तीन महिन्यात त्याने मला चांगलेच तयार केले होते. त्यामुळेच मी राकेशला बरेचदा हारवू शकत होतो. अर्थात राकेशपण चांगलाच खेळाडू होता. आमच्या बऱ्याचशा खेळींचा दर्जा एखाद्या टूर्नामेंट इतका नक्कीच होता. पण मी जेंव्हा हरायचा तेंव्हा त्याचे कारण रीटाचा आसपासचा वावर हेच असायचे. दुसरी त्याच्यादृष्टीने आनंदाची गोष्ट म्हणजे धमकी देणारी पत्रे यायची बंद झाली होती. त्याने तसे बोलून पण दाखविले. पण याच गोष्टीची मला काळजी वाटू लागती. धोका जर दूर झाला तर अंगरक्षक कशाला असा विचार राकेशसारखा माणूस नक्कीच करेल.याच विचारात असतांना मला पाहिजे असलेली संधी चालून आली.मी राकेश बरोबर शहरातल्या पूर्व भागाकडे जात असतांना तो अचानक म्हणाला, “उद्या मी सुरतला जात आहे. कदाचित मला

तिथे दोन आठवडे रहावे लागेल. तू सुरतला माझ्याबरोबर यायची काही गरज नाही."

मला तिथेच वाटले की आता ही नोकरी संपली. दोन आठवडे मी इथे एकटाच काय करणार. हा थोडाच फुकटचा पगार देईल.

“मग मी काय करू?”

“काही करू नकोस, घराकडे लक्ष दे.”

मला रीटाबरोबर हा एकटा कसा काय राहू देतो म्हणून मी विचारले, “ते तर रीटापण करू शकेल.”

“ती माझ्याबरोबर येतेय!”

मला वाटले होते तेवढा काही तो मूर्ख नव्हता तर. म्हणजे मी घरफोडी होऊ द्यायची नाही एवढेच.

“पाहिजे तर मी आशाला पण थोडी मदत करेन.”

“नको. माझा धंदा फार महत्वाचा आहे.तू ऐवढेच कर.”

दुपारी मला काही विशेष काम नव्हते.मी ऑफिसमध्ये बसून चार सिगरेट ओढल्या. पेपर पूर्ण वाचून काढला. राकेश आणि ऑफिस संपेपर्यंत केबिनमध्येच होते. मी एक दोन वेळा थोडा कानोसा घेतला. पण ते फारच हळू आवाजात बोलत होते. माझ्यापेक्षा राकेशचा आशावर जास्त विश्वास आहे या कल्पनेनी

मी बेचैन झालो. तो साठीच्या दरम्यान सहज असेल, या वयात मुलासाठी प्रयत्न करण्यापेक्षा मलाच त्याने वारस केले तर किती छान होईल असा विचार माझ्या मनात डोकावला पण वाटणे वेगळे आणि प्रत्यक्षात होणे वेगळे . अंदाजे सहा वाजता दोघेही बाहेर आले. राकेश मला म्हणाला, “ चला निघू !”

मी दिवसा आशाला काही मदत करू का?” मी उगाच म्हणालो. त्या दोघांनी एकमेकांकडे बघितले आणि आशानी नकारार्थी मान हलविली. तेव्हा मी तिला किती दुखावले आहे हे माझ्या लक्षात आले.

“नको, आशा मॅनेज करेल .” मी त्याच्यामागे कारपर्यंत गेलो. सीटचे काम सोडल्यास कार बऱ्यापैकी ठीक केली होती. आता ती सहज नव्वद पर्यंत स्पीड घेत होती. राकेशला हा चमत्कारच वाटत होता.

“ राकेश,तू सुरतला दोन आठवडे असणार. धंदा हा असा धोकादायक.स्त्रीला नाही म्हटले तरी काही मर्यादा असतात.”

“ तुला नक्की काय म्हणायचे आहे ?” राकेश म्हणाला.

“ सर्व जबाबदारी आशावर टाकणे धोक्याचे होईल.”

त्यानी तोंडावर हात ठेवून हसू दाबले.

"तुला आशा माहिती नाही. ती माझ्यापेक्षाही हुशार आहे आणि तुझे आणि तिचे तर पटत नाही."

मी माघार घेतली. दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता मी राकेश व रीटाला सोडायला एअरपोर्टवर गेलो. रीटाला मी पहिल्यांदाच स्लॅक् व स्वेटरमध्ये बघितले. तिने निघण्याआधी मला हजार सूचना दिल्या. त्या सूचनांमध्ये किंचितही आपुलकी नव्हती. एखादा रोबोट जसा आज्ञा देतो तशी ती बोलत होती. राकेश कालच्या बुद्धिबळाच्या डावाबद्दल बोलत होता. माझे कुठे चुकले ते त्याला स्पष्ट आठवत होते. गाडी थांबताच राकेश त्याचा सुप्रसिद्ध कोट घेऊन उतरला. मी डिकीतून सुटकेसेस काढण्याकरता गेलो. सुटकेसेस बाहेर काढत असतांना रीटा माझ्या मागोमाग आली. "उशीर होईल. एवढे सर्व सामान व चेकिंग याला वेळ लागेल." मी म्हणालो." तू त्याची काळजी करु नको." रीटा म्हणाली, " फक्त आम्ही नसतांना नीट रहा. माझ्या गैरहजेरीत दुसरी कोणतीही स्त्री घरी आणू नकोस."

" तुला मी म्हणजे कोण वाटतो ?"

" तुझ्या टाईपचे लोक मी चांगले ओळखते. मी नंतर सांगितले नाही असे म्हणू नकोस."

तेवढ्यात आतून एक रिसेप्शनिस्ट व पोर्टर आले. त्यांनी भराभर सामान ट्रॉलीवर ठेवले आणि आत नेले. राकेशनी त्यांच्या हातात काही कोंबल्याचे मला दिसलेच. काउंटरवर असतांनाच त्यानी मला बोलावले आणि घराची नीट काळजी घे एवढी महत्वाची सूचना देऊन तो रीटासह विमानात बसला. विमान सुटल्यानंतर मला एकदम मोकळे वाटले. आता दोन आठवडे मी राजा होतो.

-----------------------*-----------------------

## प्रकरण ६

मी आधी नीताला सायंताराला आणणार होतो पण आता तो बेत मी रहित केला. तिचा 'माझ्या टाईपचे लोक ती चांगले ओळखते' हा शेरा भला चांगलाच झोंबला होता. मी जळफळतच सायंताराला परतलो. सर्व घर पूर्णपणे धुंडाळायचे मी ठरवले. इतकी वर्षे ते इथे रहात होते, नक्की माझ्याहाती काहीतरी चिठीचपाटी लागणारच. काहीतरी असा सज्जड पुरावा मला तिच्या बाबतीत मिळायला पाहिजे. तो वापरुन मी तिला नामोहरम करणार होतो. माझी खात्री होती की ती पण राकेशला लुबाडायच्या उद्देशानीच त्याच्याबरोबर रहात होती. मी संपूर्ण ग्राउंड फ्लोअर, बाथरूम, जिन्याखालची जागा, राकेशची खोली अगदी माझी खोली पण पूर्णपणे तपासली, काहीही मिळाले नाही.

त्यापूर्ण रिकाम्या घरात सारखा तिचाच भास होत होता. तिची खोली मी सर्वात शेवटी तपासायला घेतली, पण तिला कुलूप होते. जुन्या पद्धतीचे गोदरेजचे कुलूप होते ते.थोडेसे गंजले पण होते. सर्व खोल्या उघड्या असतांना तिने स्वतःच्याच खोलीला कुलूप का लावले असावे ? मी विचारात पडलो. कुलूप उघडणे मला कठीण

नव्हते पण ते सहज लक्षात आले असते. दुसरा मार्ग काय आखावा असा विचार करतांना मला मागच्या बाजूची खिडकी आठवली.

जरी घर आडबाजूला असले आणि वर्दळ कमी असली तरी मी खिडकी उघडायचा प्रयत्न करीत असतांना कोणी बघायची शक्यता होती.काचा पुसण्याचा बहाणा केला तर चालू शकले असते. पण हे मला दिवसा करणे भाग होते. रात्री केले तर कोणीही पोलीसांनाच फोन केला असता. एव्हाना दुपारचे तीन वाजले होते. म्हणजे घाई केली तर अजून दोन तास माझ्या हातात होते, मी घाईघाईत किचनमधे जाऊन जे मिळाले ते खाऊन घेतले. नंतर एक बादली पाणी आणि कपडा घेवून खिडकीच्या खाली शिडी लावली, अर्थातच स्क्रू ड्रायव्हर बरोबर होताच. अगदी सावधानतेनी मी खिडकीची मूठ तपासली माझ्या बाजूने असणारे स्क्रू काढले तर पूर्ण मूठच आत पडून मी खिडकी उघडू शकलो असतो. शेवटचा स्क्रू काढताच मूठ आत पडल्याचा आवाज आला. आजूबाजूला कोणाला हा आवाज ऐकू आला की काय हे बघण्यासाठी मी सहज गेटकडे वळून बघितले आणि इतका दचकलो की खालीच पडलो असतो कारण गेटपाशी एक माणूस उभा होता व शांतपणे हाताची घडी घालून मी काय करतो ते बघत होता.

मी कसेबसे स्वतःला सावरले व हळूहळू खाली उतरू लागलो. तोवर तो शिडीपर्यंत आलाच होता. तो एक मध्यमवयीन माणूस होता. त्याच्या हातात एक चामडी बॅग होती त्यावर राम इलेक्ट्रिकल असे लिहिले होते.

“मी केशव,राम इलेक्ट्रिकलकडून आलो आहे. तुमचा बोर्ड बदलायला मालकांनी पाठविले आहे. ”

“तुम्हाला राकेशला भेटायचे आहे काय ? सॉरी, पण दोघेही घरी नाहीत .” मी कसेबसे म्हणालो.

“ मग तू इथे काय करत आहेस?”

“ खिडक्या पुसत आहे.”

“ पण तू तर खिडकी उघडत आहेस.” याने बरेच काही पाहिलेले दिसते. हा रीटाला भेटला तर सांगणारच.

“बरोबर आहे. पावसाने खिडकीचे लाकूड फुगले आहे. परत आत जाऊन जोर लावण्यापेक्षा बाहेरुनच काम करतो आहे.”

“मी तुला आधी कधी पाहिले नाही.”

“मी त्यांचा शोफर आहे. साहेब आणि मेमसाहेब सुरतला गेले आहेत.जातांना हे काम कर म्हणाले. तुम्हाला मी काय घरफोड्या वाटलो ?"

त्याने माझ्याकडे नीट न्याहाळून बघितले. त्यांच्या डोळयातील शंकेचा भाव थोडा कमी झाल्यासारखे मला वाटले. “चला, जरा चहा घेऊ,एवीतेवी मी खाली उतरलोच आहे.”

“जरुर जरूर.” तो आनंदाने म्हणाला. आम्ही दोघेही आत गेलो. मी चहाचे आधण ठेवले.

“ मग, तुमचे काम कसे चालले आहे?” मी विचारले आणि पस्तावलो. नंतर तो त्याचे काम, कामातल्या अडचणी यावर एक तास न थांबता, न थकता बोलत बसला. शेवटी मी कंटाळलो आणि त्याला म्हणालो, “केशव, मला अजून बरीच कामे आहेत.”

“अरे देवा, पाच वाजले की काय, मला निघायला हवे.” तो म्हणाला, “ साहेबांना मला एकदा भेटायचे आहे.” “म्हणजे ?”

“ एस्टीमेट द्यायचे होते. नंतर वाद नको.”

आणि हा राकेशला ओळखत असेल समजून गेला तासभर मी याची टकळी सहन केली.

“बर , या आता” दुसरे काय म्हणणार.

रात्री आठ वाजता मी खिडकीतून रीटाच्या खोलीत प्रवेश केला. खोलीत परफ्यूमचा वास दरवळत होता. मी एक एक ड्रॉवर, कपाट तपासायला सुरवात केली. रुमाल, बायकांच्या वेगळ्या

वेगळ्या वस्तु, सर्व मी अत्यंत काळजीपूर्वक तपासल्या. प्रत्येक वस्तु जशी होती तशी ती परत ठेवत होतो कारण मी अत्यंत धोकादायक क्षेत्रात काम करत होतो याची मला जाणीव होती. वार्डरोबमध्ये अक्षरश: ढिगानी कपडे होते. वापरलेले, न वापरलेले अस्ताव्यस्त पडले होते.एका ड्रॉवरमध्ये मला काही पत्र व फोटो सापडले. त्यावरून असे वाटत होते की ती नाईटक्लब मध्ये डान्सर होती. फोटोत तिचे पार्टनरपण होते. पत्राचा जुडगा आणि फोटो मी नंतर शांतपणे वाचण्याकरता घेतले. तरीपण माझ्या हाती काही विशेष लागले आहे असे मला वाटत नव्हते. पत्र आणि फोटो महत्वाचे असते तर तिने असे उघड्यावर ठेवले नसते. शेवटी मला जे पाहिजे ते वार्डरोबच्या मागे लपवून ठेवलेले दिसले. एक पोर्टेबल टाईपरायटर ,एका अर्धवट टाईप केलेल्या पत्रासह, वार्डरोबच्या मागे लपवलेला होता. त्या पत्रात पण म आणि व अस्पष्ट होते.

टाईपरायटर घेऊन मी माझ्या खोलीत गेलो.

-----------------------*-----------------------

## प्रकरण ७

चार दिवस एकट्याने काढल्यावर माझा मलाच वीट आला. ते चार दिवस मी सर्व पत्रे परत परत वाचून काढली.कोलकाता येथील एका नाईटक्लबमध्ये ती डान्सर असतांना तिच्या फॅन्सची पत्रे, तसेच बऱ्याच फॅन्सकडून तिला आलेली आलेल्या लग्नाच्या मागण्या असाच भरणा होता तो. फक्त बिपीन नावाच्या एका सहकलाकाराची पत्रे जास्त होती.त्याची व रीटाची सही असलेला एक छानसा फोटोपण होता. त्यात राकेशचे फक्त एक पत्र होते.अतिशय संक्षिप्त. कदाचित काही कारणामुळे हेच एक पत्र तिने जपून ठेवले असेल. पत्र असे होते.

*प्रिय रीटा,*

*अजून आपल्यासमोरील धोका टळला नाही. इथे जास्त काळ थांबणे धोक्याचे आहे. काय करायचे ते जास्तीत जास्त एका आठवड्यात ठरव. सध्या माझ्याजवळ आपल्या दोघांना पुरेल इतका पैसा आहे. आपण सुरतला जाणे सोयीस्कर ठरेल. सर्व शांत*

*झाल्यावर नंतर परदेशी जाऊ. एक नवीन आयुष्य सुरु करु. लवकर कळव.*

*तुझा*

*राकेश*

मला या पत्रावरून तरी काही उलगडा झाला नाही की अशी कोणती गोष्ट होती ज्यामुळे रीटाला या गिधाडाशी लग्न करावे लागले. रीटानी राकेशला धमकीची पत्रे का लिहावी ? काहीतरी माझ्या हाती लागले नक्कीच होते पण मला त्याची संगती लावता येत नव्हती. याच चार दिवसात मी तिच्या रुमची चावी पण बनवून घेतली आणि खिडकी पण दुरुस्त केली.

सहाव्या दिवशी मी ऑफिसला फेरी मारली. आशा कामात होती.नेहमीप्रमाणे दाणदाण टाईपरायटर ठोकत होती. “हॅलो.” मी म्हणालो, थोडासा हसण्याचापण प्रयत्न केला.म्हटले, “ तुला एकदा भेटावेसे वाटले.”

“ मी कामात आहे.”

“चांगली गोष्ट आहे. याचा अर्थ धंदा जोरात आहे.”

“ पवन, मला तू इथे नको आहेस.”

“ ठीक आहे,पण मला वाटले की तुला काही मदत करावी.”

“मला तुझी मदत नको.”

“ हे मला मान्य आहे की मी तुझ्याशी नीट वागलो नाही, पण तू मला माफ करू शकत नाही काय? मी माफी मागतो.”

“त्याची गरज नाही.”

“ आपला बॉस एकच आहे. मी तुला कामात काही मदत करू काय ?”

“ एकच मदत कर, इथून चालता हो.”

“ ते तर मी करणारच आहे. पण अजून काही धमकीची पत्रे आली काय?”

“ नाही. तू आल्यापासून एकपण नाही आणि बरे झाले आठवण करून दिली. आठ दहा दिवसांनी राकेश

येईल तेंव्हा मी त्याला तुला उगाच पोसू नकोस हे सांगणार आहे.”

मी माझ्या बडबडीने रीटाच्या साथीला ही दुसरी तोफ निर्माण केली होती.

सायंताराला परतल्यावर मी सर्वप्रथम टाईपरायटर बाहेर काढला. बराच विचार करून मीच एक धमकीपत्र टाईप केले. त्यात लिहिले तुला तीन वेळा वार्निंग दिल्या आहेत. ही शेवटची. यानंतर

तू स्वतःला सुरक्षित समजू नको. कधीतरी, कुठेतरी आम्ही तुला ठार करू. मरणपण तुला तडकाफडकी येणार नाही. कुत्र्या, त्याआधी आम्ही तुझे खूप हाल करू.

पत्र मिळाल्यानंतर राकेशची काय अवस्था होईल याची मी कल्पना करू शकत होतो. आशातर मला काढायचा विचारपण त्याच्या गळी उतरवू शकली नसती, आणि रीटा, स्वतःला गुंतवू न देता ती राकेशला काहीच सल्ला देवू शकत नव्हती. राकेश जेंव्हा रीटाला पत्र दाखवेल तेव्हा तिचा चेहरा कसा होईल हे बघण्याची मला तीव्र इच्छा होती.

सोमवारी मी पत्र पोस्टात टाकले.

घरी येताच फोन वाजला. राकेश फोनवर होता.

'रात्री नऊ वाजता आम्ही येऊ. एअरपोर्टवर ये.' एवढेच तो म्हणाला. आवाजावरुन त्याला खूप सर्दी झाली असावी असे वाटले.

मी साडेआठलाच एअरपोर्टवर पोचलो.

तीच रिसेप्शनिस्ट काऊंटरवर होती. मला बघताच च म्हणाली राकेश नऊ वाजता येणार आहे.

" म्हणजे तुला परत कमाई !"

“आपले काम कर.” बरोबर नऊ वाजता रीटा व राकेश त्याच्या प्रसिद्ध कोटसह आले. एक पोर्टर त्यांचे सामान घेऊन आला. त्याने एक ब्लॅंकेटपण कुठूनतरी पैदा केले. ते राकेश लगेच स्वतःभोवती गुंडाळले.

“राकेश, ट्रिप कशी काय ?”

“काही विचारू नको. मला जबरदस्त सर्दी झाली आहे. कार कुठे आहे की मला रात्रभर असेच उभे रहावे लागणार आहे?” तो खेकसला. मी धावत कार आणायला गेलो. कार आणल्यावर मी सामान डिकीत ठेवले. राकेश आणि रीटा तोवर आधीच मागे बसले होते. कार सुरू करण्याआधी मी राकेशला विचारले, “ राकेश, तुला जास्त त्रास होत असेल तर खिडकी बंद करू काय?”

“ बंद कर आणि लवकर घरी चल.”

“राकेश, सारखी चिडचिड करू नको.” रीटा म्हणाली.

“तुला सांगायला काय होते? त्रास मला होतो. तीन दिवस झाले मी धड श्वासपण घेऊ शकत नाही आणि धड झोपलो पण नाही.” रीटाने काहीतरी उत्तर देण्यासाठी तोंड उघडले पण मी स्मितहास्य करतांना बघून गप्प बसली व खिडकीबाहेर बघू लागली.

“राकेश, तुला एकदम एवढी सर्दी कशी काय झाली ?”

“ तू गप्प बस आणि गाडी चालव. इथे मी मेलो तरी कोणाला त्याचे काही काय आहे ?” राकेश.

आता हसायची पाळी रीटाची होती. घरी पोचताच त्याने मला सुनावले,

“ पवन, तू दुसरे काम बघ.या ट्रिपमध्ये माझे फारच नुकसान झाले आहे. तुला उगाच पगार देणे मला परवडत नाही !”

"ठीक आहे राकेश. माझे काही म्हणणे नाही. पण एकप्रकारे तुझा विमाच रद्द करत आहेस.उद्या जर काही झालेच तर तुझ्याबरोबर कोणीच नसणार.”

तो माझ्या नजरेला नजर न देता म्हणाला की तो प्रॅक्टिकल जोकच वाटतो. रीटापण म्हणते की तीन आठवड्यात कुठे काय झाले ? कशाला पैसे वाया घालवायचे? मला परवडत नाही. बस. उद्यापर्यंत थांब मी मनात म्हणालो उघडपणे मात्र त्याच्याशी सहमती दर्शविली.

“ठीक आहे. बुधवारीच मी जाईन.”

मी इतक्या लवकर तयार होईल असे त्याला पण वाटले नसावे.

“पण बुद्धिबळाचे डाव मात्र माझ्या चांगल्याच लक्षात राहतील, डाव खेळायला मात्र जरूर अधून मधून येत जा.” उद्या वेगळाच डाव सुरु होईल मी पुटपुटलो.

“ काही म्हणालास?”

“काही नाही .”

“ ठीक आहे, आता मी आराम करतो.” रीटा तेवढ्यात तिथे आली, “ मी काही खायला करू काय ?”

“ नको,मी आता झोपणार आहे!” असे म्हणत तो गेला पण.

“राकेश तुला काही म्हणाला काय ?” रीटा म्हणाली.

“ कशाबद्दल?”

“हा आठवडा तुझा येथील शेवटचाच.”

“हो काहीतरी म्हणत होता खरा. पण मी लक्ष दिले नाही. जास्त आजारी असल्याने बडबडत असेल असे मला वाटते!”

“ तू स्वतःला जरा जास्तच शहाणा समजतो. खर आहे ना? बुधवारी तुझा शेवटचा दिवस नक्की.”

“ रीटा, एवढ्या ठामपणे काहीच बोलू नकोस. बुधवारला अजून दोन दिवस आहेत !”

तिने रागाने माझ्याकडे बघितले व तिथून निघून गेली. मी पण माझ्या चक्कर मारायच्या आवडत्या कामाला सुरवात केली.

दुसऱ्या दिवशी दहा वाजता फोन वाजला.फोन मी उचलला. ‘मला राकेशशी बोलायचे आहे’ आशाचा आवाज मी ओळखला, “तो आजारी आहे अजून झोपला आहे!”

“फोनवर येऊ शकणार नाही ?”

“ नाही. त्याला भयानक सर्दी झाली आहे.”

“महत्वाचा निरोप आहे!"

“मला सांग.”

“त्याला म्हणाव मी बारा वाजेपर्यंत येत आहे.”

“नको येऊ कारण तुला स्टेशनवरून घ्यायला मला यावे लागेल.”

“नीट बोल आणि सांगितले तेवढे कर.” तिने रिसिव्हर आदळला. म्हणजे पत्र मिळाले व तिने वाचले. नाहीतर ऑफिस सोडून तिला इथे यायचे काहीच कारण नाही. मी आरामात राकेशकडे गेलो. तो पांघरुण घेऊन झोपला होता. त्याला आवाज देताच तो चिडून म्हणाला, “मला एकट्याला राहू द्यायचे नाही काय?, मी झोपायचा प्रयत्न करत आहे.”

“ आशाचा फोन होता.ती बारा वाजेपर्यंत येत आहे!” तो दचकला, अर्धवट उठून बसला.

“इथे?”

“ होय, मी काय करु? तिला आणायला जाऊ?”

“होय, ती का येत आहे याबद्दल काही बोलली?”

“काहीतरी महत्वाचे आहे एवढेच म्हणाली.”

“लवकर जा आणि तिला घेऊन ये.” मी निघणार तेवढ्यात रीटा बाहेरून आत आली.

" कुठे चालला ?”

“ आशा येत आहे. तिला आणायला.” तिचा चेहरा आक्रसला व ती राकेशकडे गेली. म्हणजे रीटाचे आणि आशाचे पण पटत नव्हते तर. आशा स्टेशनबाहेर येताच मी तिला हात केला.

“आशा, प्रवास कसा काय झाला?”

“ पवन, कामाशी काम ठेव !”

“मला पण हौस नाही तुझ्याशी बोलायची पण एवढी धावपळ रोज केलीस तर नक्कीच बारीक होशील.”

“ पवन, कधीकाळी संधी मिळाली तर मी तुला चांगलाच धडा शिकवेन.”

“ मी त्या दिवसाची वाट पाहत आहे.”

माझ्या तोंडून नियतीच बोलत होती. सायंताराला पोचल्याबरोबर रीटा व आशा च्या खोलीत घाईने गेल्या आणि त्यांनी दार बंद केले. शक्य असते तर त्या खोलीत मला माशी व्हायला आवडले असते. मला लवकरच बोलावणे येईल याची मला खात्री होती. या दोघीपण राकेशच्या मागे लागून कमीतकमी माझ्याऐवजी दुसरा अंगरक्षक ठेवावा म्हणून प्रयत्न करणार याची मला खात्री होती. राकेश या दोघींचेही ऐकणार नाही याचीपण मला खात्री होती कारण त्याच्यासमोर रमणला मी मारलेला ठोसा. धमकीचे पत्र पाठविण्याची माझी चाल फारच यशस्वी ठरली होती. तीन वाजायच्या सुमारास एक लोकल टॅक्सी आली व आशा गेली. ती फारच मलूल वाटत होती. डोळेपण लालसर दिसत होते. याचा अर्थ तिला स्टेशनवर सोडण्याकरता पण राकेश मला जाऊ द्यायला तयार नव्हता. आशा गेल्यावर पंधरा मिनिटांनी रीटा बाहेर आली व राकेश मला बोलवत आहे असे सांगून गेली. राकेश अंथरुणातच बसून होता. काही न बोलता त्याने मला पत्र दिले. मी पण वाचण्याचे सोंग केले.

“ आशाने आणले. पवन तू जाऊ नकोस. समजले?”

आता जास्त ताणण्यात अर्थ नव्हता.

“ अजिबात काळजी करू नको. राकेश कोणीही तुला हात लावू शकणार नाही.”

“ तुला खात्री आहे?”

“ जे कोणी असतील ते तुला फक्त घाबरवण्याचा प्रयत्न करत आहे. तुझ्या केसालाही धक्का लागणार नाही ही जबाबदारी माझी.”

त्याचे ओठ कोरडे पडले होते. त्यानी ओठावर जीभ फिरवली.

“काल मी जे काही तुला बोललो त्यामागे रीटा होती. मला स्वतःला तसे वाटत नव्हतेच.”

“राकेश, तुझी तब्येत ठीक नाही हे मी तुला कालपण म्हणालो होतो.”

“ खरच जे काय झाले ते विसर.”

आणि आम्ही दोघांनी हात मिळवले. रात्री जेमतेम तासभर झोप झाली असेल तर मला एकदम परफ्यूमचा वास आला आणि मी जागा झालो.लाईट लावायला उठणार तोच तिचा आवाज आला लाईट लावू नकोस.

“तुला काय पाहिजे?”आम्ही अंधारातच कूजबूजत होतो.

“ पत्र तुच लिहिले,खरे आहे ना?”

मी हसलो. “ दुसरे कोण लिहिणार ?”

“पण का?”

“ मला इथे रहायचे आहे म्हणून.”

“ तुला इथे का रहायची इच्छा आहे?”

“तुला माहिती आहे ते. तुला बघितल्यापासून मी वेडा झालो आहे. हे तू पण जाणून आहेस.”

“ आता मी काय करणार याची कल्पना आहे ?”

“ राकेशला सांगणार? मग मला पण सांगावे लागेल की आधीची तीन पत्रे कोणी लिहिली होती. ”

शांतता.

मी लाईट लावला. मी घामाघूम झालो होतो.ती निघून गेली होती.

----------------------*---------------------

# प्रकरण ८

त्या रात्री मला झोप लागली नाही. किंचित डुलकी लागली तरी तिच स्वप्नात यायची. मी तिला कोंडीत पकडल्याची मला खात्री होती पण त्याचबरोबर तो साधारण नाही, तिच्यापासून सावध रहायला हवे असे अंर्तमन सांगत होते. सकाळ झाल्यावर मला सुटका झाल्यासारखे वाटले. दिवसभरात राकेश आजूबाजूला नसताना तिला भेटून एकदा सज्जड दम भरण्याचे मी ठरवले पण राकेशला भेटल्यानंतर या सर्व योजनेचा बोऱ्या वाजला कारण एकतर तो इतका घाबरला होता की एक क्षणपण मला नजरेआड होऊ द्यायला तयार नव्हता, आजारी होता तरी हॉलमधे येऊन बसला.येथून सर्व येणारे जाणारे दिसू शकतात असे त्याचे तर्कट. जेवतांना तर बोलायचे नाही असा इथला अलिखित नियम होता. रीटा एक शब्दही बोलायची नाही आणि राकेश खाण्यात इतका तल्लीन असे की एक शब्दही बोलू शकत नसे. तिनेपण दिवसभर मला टाळलेच.

शेवटी संध्याकाळी सहाच्या दरम्यान राकेश हॉलमध्ये बसल्यावर मी त्याला म्हणालो,

“ मी जरा चक्कर मारुन येतो.फक्त सर्व व्यवस्थित आहे हे बघण्यासाठी.”

“हो, हो, सगळी दार, खिडक्या नीट बंद आहेत का ते पण बघ आणि तू पिस्तुल वापरू शकतोस काय?”

“ राकेश, मी सैन्यात होतो हे तुला माहिती आहे.”

“अरे, खरच की, हे घे.” असे म्हणून त्याने एक 0.38 कोल्ट्स रिव्हॉल्व्हर ड्रॉवरमधून काढून मला दिले.

“ गोळया भरल्या आहेत.”

“ राकेश, तुझ्याजवळ लायसन आहे?”

“ नाही पण त्याची गरज नाही.”

“ मग नको. लायसन नसतांना वापरणे फारच धोकादायक आहे.” असे म्हणून मी त्याला ते परत केले. खरे कारण म्हणजे माझ्याजवळ रिव्हॉल्व्हर राहिले असते तर ते वापरण्याचा मोह मला झाला असता हे होते.

“ ठीक आहे.” असे म्हणत त्याने ते परत ड्रॉवरमध्ये ठेवले. मी जेव्हा बाहेर जाण्यासाठी वळलो तेव्हा त्याने रीटाला बोलवून आण असे मला सांगितले. ती किचनमध्ये असेल असे मी सांगताच जिथे असेल तिथून तिला बोलव असे तो म्हणाला.

मी किचनमध्ये गेलो. “राकेश बोलावतोय.” तिने माझ्याकडे बघितले व हसली. आत्तापर्यंतच्या वास्तव्यात तिने स्वतःहून केलेले हे पहिले हास्य.

“ बोलावणारच. तू त्याची फारच गाळण उडवली आहे.”

“ ते असू दे, तू रात्री माझ्या खोलीत ये. जरुरी बोलायचे आहे.”

“ कठीण आहे. राकेश एक मिनिटपण एकटा रहायला तयार नाही आणि त्याला तूच कारण आहेस.”

तेवढ्यात राकेश तिथे आलाच. “तुम्ही दोघे इथे काय करत बसला ? तिथे माझा एकट्यानी जीव चाललाय. तुम्हाला त्याचे काहीच वाटत नाही?” तो रागारागाने बोलू लागला.

रीटा किती हुशार आहे याची मला कल्पना आली. सौम्य धमकी देऊन जे सहज झाले असते त्याला मी झणझणीत भाषा वापरुन अजूनच गहन केले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता फोन वाजला. राकेशनीच उचलला. मी समोरच असल्याने मला त्यानी सांगीतले की आशा येत आहे. मला पहिल्यांदाच आशाच्या येण्याचा आनंद वाटला. म्हणजे दोन तास यांची खलबत चालणार. मी रीटाला भेटू शकत होतो.

“मी आणायला जाऊ?” उत्तर माहिती असूनपण मी उगीच विचारले.

“नको, येईल ती टॅक्सीने.”

चारच्या दरम्यान आशा आली. मी आशा आल्यावर साधारण पंधरा मिनिटे जाऊ दिली. नंत्तर मी खोलीकडे जाण्यास निघालो तर शेडच्या दारातच रीटा उभी होती.

“मी तुझ्याकडेच येत होतो.”

“ मला कल्पना आहे.”

“याआधी आपण भेटणे सुरक्षित नव्हते.”

“नको पवन,ते बघतील.”

मी दाराच्या फटीतून बघितले. आशा व राकेश बोलतांना दिसत होते. त्याची काळजी नको. अजून दोन तास ते बाहेर येत नाही असे म्हणत मी मागे बघितले तर काय दोन्ही हात डोक्यामागे ठेवून ती मंदपणे हसत होती.

“मला हे पण माहिती आहे म्हणून तर मी निर्धास्त आहे.”

“मग हा दुरावा का? मी तर वेडा झालोय.”

“ मी प्रथम तूला पाहिले तेव्हाच तुझ्या प्रेमात पडले होते आणि माझ्याकरता वेडी होणारी लोक मला आवडतात.”

आणि आम्ही एक झालो.

नंतर ती माझ्या कुशीत असतांना म्हणाली, “ पुढच्या वेळेस राकेश जेव्हा सुरतला जाईल, तेव्हा मी इथेच राहीन.”

“ या वेळेस तरी का गेलीस?”

“ त्याला संशय येऊ नये म्हणून.”

“म्हणजे तो आता जाईपर्यंत मी तुझ्यापासून दूर रहायचे असेच ना?”

“हो. साधारणपणे तो महिन्यातून एकदा जातोच.”

"हे असे कुठवर चालायचे”

“आपण राकेशचा खून करेपर्यंत.”

मी दचकून तिच्यापासून दूर झालो.

“काय म्हणाली?”

“ तू जे ऐकले तेच.” तेवढयात गेटपाशी डेअरी व्हॅन आल्याचा आवाज आला. दरवाज्यापाशी दूध ठेवून व्हॅन गेली पण. मी परत रीटाला विचारले, “ तू काय म्हणालीस?"

“आपण राकेशचा खून करू शकतो.”

“ तुझे डोके तर ठिकाणावर आहे?”

“माहिती नाही. पण दुसरा पर्याय मला तरी काही दिसत नाही.”

“तू खरच मनापासून म्हणते आहे ?”

“अर्थात!”

“ खुनाची सजा फक्त फाशीच आहे. माहिती आहे?”

“ मी खुनाच कुठे काय म्हणाले?”

“मग एवढा वेळ काय म्हणत होती?”

“या आजारपणात तो नैसर्गिकरित्या मरू शकेल, मग या चोरटेपणाची आपल्याला गरज नाही.”

“ गप्प बस.”

“तुला आवडली नाही माझी कल्पना? मला पण नाही आवडली.” आणि ती निघून गेली.

दुसऱ्या दिवशी राकेशने अचानक तो ऑफिसला जाणार असल्याचे जाहीर केले.

“ मी धंद्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. मला जायलाच हवे.”

“तुला जमेल काय ?”

“जमायलाच हवे. तू रिव्हॉल्व्हर घेशील काय?”

“ठीक आहे !” त्याच्या चेहऱ्यावरचा ताण थोडा निवळला. बहुतेक हा आशाचा सल्ला असावा. मी माझा रात्रीचा राउंड मारला. नेहमीप्रमाणे वरच्या खोलीवर लक्ष ठेवले, रीटा केस विंचरत होती. मी खाली असल्याचे तिला बहुतेक जाणवले असावे. थोड्या वेळाने तिने लाईट बंद केला. मी पण झोपायला गेलो. नंतरचा आठवडा काहीही घडले नाही. रोज़ मी राकेशबरोबर ऑफिसला जायचो व संध्याकाळी परतायचो. आठवडाभर माझ्या कानात तिचे हेच शब्द रुंजी घालत होते की ‘आपण त्याला मारु शकतो.’ आठव्या दिवशी ऑफिसमधून परत येतांना त्याने जाहीर केले की त्याला परत सुरतला जावे लागणार आहे आणि यावेळेस तो एकटाच जाणार आहे.

“काय म्हणून?” विचारायचे म्हणून मी विचारले.

“छोटा राकेश येत आहे म्हणून रीटा येणार नाही.”

“ वा,अभिनंदन.”

“ धन्यवाद.तू पण लग्न कर.”

“ नको त्याऐवजी मी एखाद्या धनाढ्य बापाला दत्तक जाईन.”

“आयुष्याविषयी जरा गंभीरपणे विचार कर.”

“हो.तोच प्रयत्न करत आहे.”

----------------------*----------------------

## प्रकरण ९

मी त्याला एअरपोर्टवर सोडायला गेलो. रस्ताभर बिचारा येणाऱ्या बाळाबद्दल बोलत होता.

“ पवन, तुझ्याशी या विषयावर बोलण्यात अर्थ नाही हे मला कळते पण बाळ येणार ही कल्पनाच आपल्यात अपूर्व बदल घडवून आणते.”

देव जाणे रीटाने यालाव काय सांगितले असे मला वाटले.

परत आल्यावर मी तडक रीटाकडे गेलो.

“तू त्याला काय सांगितले ? त्याने मेडिकल चेक अप करायला लावला तर ?”

“काही होणार नाही.”

“पण त्याची तरी खात्री पटली आहे का?”

“थोड़ा साबण खाल्ला तर भरपूर उलट्या होतात!”

“म्हणजे हे सर्व खोटे आहे?”

“अर्थातच”

मला एकदम हसू आले.

“यात एवढा काय विनोद आहे?”

“समज त्याला कळले की आपली फसवणूक होत आहे तर?”

“पवन, दूसरा पर्याय मी सुचविला आहे.”

“त्याऐवजी आपण दोघेही इथून पळून गेलो ?”

“खायचे काय ?”

“मी काहीतरी कामधंदा बघेन.”

“सॉरी पवन, मी गरिबीचा भरपूर अनुभव घेतला आहे. परत तोच अनुभव घ्यायची माझी तयारी नाही.”

कोणीतरी खाडकन मुस्कटात मारल्यासारखे मला वाटले.

“पवन, परत नीट विचार कर. आपण हे सहज करू शकतो. कोणालाही आपला संशय येणार नाही.”

मी विचारात पडलो, तिच्या म्हणण्यात तथ्य होते पण धोक्याचे काय?

“सांग तुझी कल्पना, पण मी तिची छाननी करणार.”

“जरूर, हे बघ रोज सकाळी दूधवाला दुधाचे पॅक बाहेर ठेवून जातो.”

“ पुढचे काहीही बोलू नकोस, ही कल्पना एकदम तकलादू आहे.”

“ तू हे कसे काय म्हणतोस?”

“हा प्लॅन खूप लोकांनी वापरून चोथा केला आहे. दुधाच्या पॅकमध्ये इंजेक्शनच्या सिरिंजनी विष मिसळायचे. इंजेक्शनच्या सिरिंज तुझ्या बाथरुममध्ये मी बघितल्या आहेत. तू दुध घेत नाहीस. राकेश दूध पिऊन मेल्यावर तू भरपूर नाटक करणार आणि पोलीस तुझ्यावर विश्वास ठेवणार असेच ना? पण तू गोत्यात येणार”

“कशी काय?”

“पोलिसांना मूर्ख समजू नकोस. पुरावा म्हणून तू ती धमकीची पत्रे दाखवशील व यांनीच विषप्रयोग केल्याचे सांगशील. पोलिसपण सुरवातीला तुझ्या बोलण्यावर विश्वास ठेवल्यासारखे दाखवतील. पण तो टाईपरायटर शोधायला त्यांना एक आठवडा पुरेसा आहे आणि विष कितीही जुने असले तरी कोठून आणि केव्हा खरेदी केले हे ते सहज शोधून काढतील. विषाच्या विक्रीचा रेकॉर्ड ठेवणे केमिस्टला बंधनकारक असते.”

आपल्या प्लॅनचा फज्जा उडाल्याचे रीटाच्याने कबूल करवत नव्हते. पण माझ्या तर्कांना तिच्यापाशी उत्तर पण नव्हते. अचानक

मला एका गोष्टीची जाणीव झाली, ही योजना तिच्या डोक्यात आधीपासून घोळत होती तर. पण का?

“रीटा, मी तर तुझ्या आयुष्यात आताच आलो आहे. ही योजना तर फारच जुनी वाटते. तुला का राकेशला ठार मारावेसे वाटते?”

“छान. आता तुझ्या डोक्यात प्रकाश पडला वाटते.”

“तस समज.”

“पैशाकरिता.”

“ असा किती पैसा आहे राकेशकडे?”

“सहज दहा कोटी. जास्तच पण कमी नाही. अर्थात आता तू जर मला साथ दिली आपल्या दोघांचा.”

“दहा कोटी. नगद?”

“नाही. हिऱ्यांच्या रुपात, जे आपण कोणाच्या लक्षात न येता सहज विकू शकतो.”

मी योग्य जागी पोचलो होतो.

-----------------------*-----------------------

# प्रकरण १०

दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता मी तिच्या खोलीत गेलो तर ती आरामात सिलींगकडे बघत पहुडली होती. तिला तसे बघून संयम ठेवणे फारच कठीण होते.

“ काय बघतोस?”

“ रीटा, राकेशजवळ दहा कोटी कसे काय आहे?” मी सरळ मुद्द्यावर आलो.

“ एक ना दोन, त्याचे अनेक धंदे आहेत. सगळे दोन नंबरचे. पहिले घबाड त्याने सहा महिन्यात पैसे दुप्पट करून देणे या प्रकारात कमावले, नंतर काळा बाजार, सध्या हवाला. त्या जगतात तो विश्वासू म्हणून प्रसिद्ध आहे म्हणून तो सांगेल तो आकडा लोक कमिशन म्हणून देतात.”

“ इथपर्यंत ठीक आहे. पण पुरावा काय?” मी विचारले, “तू स्वतः बघितले, दहा कोटी?”

“ करन्सी दोन कोटीची तर पाहिली आहे. बाकीचे त्यानी हिऱ्यात रूपांतर केले आहे. मात्र ते मला नाही बघायला मिळाले.”

“ एवढा माल त्यानी कुठे दडवून ठेवल आहे?”

“ मागच्या अडगळीच्या खोलीत.”

आता दचकण्याची पाळी माझी होती.

“मग तू याआधी कधी प्रयत्न का केला नाही? सगळे जर दोन नंबरचेच आहे तर राकेश पोलिसांकडे नाही जाणार.”

“जाईल.तू राकेशला ओळखत नाही. तो लुबाडल्या गेला असे त्याला कळल्यावर तो जेलमध्ये जाणे पसंत करेल पण मला पकडून देईल. तसेच त्याचे गुन्हेगारी जगात पण मित्र आहेत.”

वाटत होती तेवढी काही ती मूर्ख नव्हती.

“ठीक आहे. तरीपण तू त्याच्याशी लग्न करणे सयुक्तिक वाटत नाही. तुला सहज शेदीडशे तरुणांनी अर्थातच पैसेवाल्या मागणी केलीच होती की, मग अशी काय गोष्ट घडली की तू त्या सर्वांना सोडून या गिधाडाशी लग्न केले?” आता ती पांढरीफटक पडली.

“आणि त्याहूनही कहर म्हणजे त्याला मारणे हाच एकमेव मार्ग असल्याचे मला सारखे सांगत आहे?” मी माझा गोळीबार चालूच ठेवला.

“आपण आता भागीदार आहोत. तुला माझ्यावर विश्वास ठेवला पाहिजे.”

“याबाबतीत नाही आणि भागीदारी किती हे आधीच स्पष्ट झाले पाहिजे.”

“तुला किती पाहिजे?”

“सर्व आणि खर्च करायला बरोबर तू पण !”

“हे तर मी कालच मान्य केले आहे !” वातावरणातील ताण एकदम निवळला.

“बर एक सांग, तुला असे का वाटते की पैसा स्टोअर रूममध्ये असेल.”

“ मी दोन तीन वेळा राकेशला तिथे खणतांना बघितले आहे.”

“ठीक आहे. मी पण एकदा शोधतो.”

मी लगेच स्टोअर रूममध्ये गेतो. १५ फुट x २० फुट होती ती. सर्वत्र धुळीचे साम्राज्य होते. पण टाईल्स नीट निरखून पाहिल्या. कुठेही उचकटल्याची, किंवा खणल्याची खूण नव्हती. लेव्हल पण समान होती. काही हत्यारांवरची धूळ मी पुसून काढली. एकही हत्यार वापरल्यासारखे वाटत नव्हते. सगळी नवीन होती आणि सर्वात महत्वाचे म्हणजे मला कुठेही कुदळ दिसली नाही. अर्ध्या तासानी मी परत रीटाकडे गेलो.

“ रीटा, स्टोअर रूममध्ये पैसे नाहीत.”

“नुसते वरवर बघून, फक्त अर्ध्या तासात तुला हे कसे कळले?”

"कारण मला डोके आहे, त्या डोक्यात मेंदू आहे आणि तो मी वापरतो म्हणून.”

“ उगाच चिडचिड करू नको आणि सांगायचे नसल्यास सांगू नकोस.”

तिला माझी निरीक्षणे सांगायची माझी अजिबात इच्छा नव्हती.

“अजून सात काय पण सत्तर दिवस जरी आपण खणत बसलो तरी आपल्याला काहीही सापडणार नाही.”

“ राकेश मेल्यावर आपल्याकडे वेळच वेळ राहील.”

हिंडूनफिरून परत ती राकेशच्या जिवावर का उठत होती मला कळेना.

“ रीटा, नीट ऐक. समज आपण राकेशला संपवला, नंतर काही क्षणाकरता गृहीत धर की आपण निर्दोष सिद्ध झालो पण नंतर आपल्याला पैसे, हिरे जे काय असेल ते नाहीच सापडले तर .”

रीटा एकदम विचारात पडली.

“खरच की, मी याचा विचारच केला नव्हता. मग मि. थिंकर तुझा काय प्लॅन आहे.”

मी शांतपणे दोन ड्रिंक्स तयार केली. एक तिच्या हातात देत म्हणालो, “नीट ऐक आणि मी जश्या तुझ्या प्लॅनमधील कच्चे दुवे सांगितले तसे तू पण माझ्या प्लॅनमधले कच्चे दुवे सांग.”

“ ठीक आहे. सुरु कर.”

“तो गायब होईल किंवा त्याला गायब व्हावे लागेल अशी परिस्थिती आपण निर्माण करू. राकेशच्या गायब होण्याने फक्त तिघांना फरक पडू शकतो. आपण दोघे आणि तिसरी आशा. त्यातही आशा अत्यंत हुषार आहे. राकेशच्या गायब होण्यामागे जर आपला हात आहे असा तिला थोडाजरी संशय आला तर ती सरळ पोलिसांकडे जाईल.”

“मग तिची खात्री कशी पटवून द्यायची?”

“राकेशचे एक बिनतारखेचे तुला लिहिलेले पत्र मला सापडले आहे.” मी ते पत्र तिला दाखविले आणि माझ्याजवळचा नीताचा फोटोपण दाखविला. “ही माझी मैत्रीण नीता , ही व राकेश पळून गेले असे आपण आशाला सांगू.”

“हो, पण राकेशच्या नुसत्या पत्राने थोडीच आशाची खात्री पटणार आहे? आणि पटली तरी राकेश परत येऊ शकतोच की.”

“बरोबर. तोपर्यंत बरेच महिने उलटले असतील. नंतर तो आला तरी त्याचे पैसे आपल्याजवळच असणार.”

“ मग आपण त्याला संपवले नाही तरी काही होणार नाही?”

“नाही, ८/१० महिन्यात बॉडी मिळाली नाही म्हणजे पोलीस तपास नाही आणि मग तो असला तरी फरक पडणार नाही .” मी म्हणालो, “ आता यातील कच्चे दुवे सांग?”

“या योजनेच्या सुरवातीला किंवा शेवटी, राकेशच्या बॉडीची विल्हेवाट कशी लावणार?”

“फार्ममध्येच एक जुनी वापरात नसलेली विहीर आहे.”

“राकेशची कशामुळे एवढी घाबरगुंडी उडेल की तो सर्व पैसाअडका सोडून पळत सुटेल?”

“ ते तू माझ्यावर सोड. तू फक्त आशाची खात्री पटव.”

“आधी मला ती विहीर दाखव.”

रात्रीच्या अंधारात ठेचकाळत आम्ही त्या विहिरीकडे गेलो कारण टॉर्च वापरणे धोक्याचे ठरले असते. रीटाने हळूच विहिरीत डोकावून पाहीले. अंधारात पण शेवाळ अस्पष्ट दिसत होते.

“ठीक आहे पवन, आपण हे करूच!”

-----------------------*----------------------

# प्रकरण ११

सैन्यात असतांना मी ‘बुबी ट्रॅप’ तयार करायला शिकलो होतो. त्याच्या सहाय्याने साधारण दोनशे मीटर अंतरावरुन रिमोटद्वारे गोळीबार चालू ठेवणे शक्य असते. सैन्यातून निवृत्त होतेवेळी काहीतरी स्मृतिचिन्ह असावे म्हणून मी एक बुबी ट्रॅप मागून घेतला होता. साधारण २x२ फुटाच्या लाकडी फळीवर तो व्यवस्थित बसवता येत होता. पण सध्या ते सर्व सामान नीताच्या फ्लॅटवर पडून होते. माझी खात्री होती की हा ट्रॅप राकेशची गाळण उडवेल, म्हणून मी रीटाला सांगितले की मी मुंबईला जाऊन येतो आणि कपडे करू लागलो. एवढ्यात फोन वाजता अनवधानाने मी तो उचलला आणि हॅलो म्हणालो.एका सेकंदानंतर आशाचा किरकिरा आवाज आला, “कोण पवन काय ?”

एका क्षणाकरता जसे माझे हृदय थांबले, रक्त गोठले. मी सायंतारा पासून कित्येक मैल अंतरावर असायला पाहिजे होते आणि मी इथे फोन उचलला होता. राकेश नसतांना मी इथे आहे हे आशासारख्या चाणाक्ष व्यक्तीला माहिती होणे म्हणजे पहिल्या घासालाच खडा लागण्यासारखे होते.

“हॅलो पवन तूच बोलत आहेस ना?” माझे डोके गरगरायता लागले. रीटा तेवढ्यात रिंगचा आवाज ऐकल्यामुळे धावत आली. माझी दशा बघताच काय झाले हे तिच्या लक्षात आले. “ मूर्खा, तिला सांग रॉंग नंबर आहे म्हणून.” ती फिस्कारली.

“कोणता नंबर पाहिजे आपल्याला,” माझा आवाज मलाच ओळखू येईना. जसा घशात बेडूक कोंबला होता.

“सायंतारा,दलपत रोड.”

“ सॉरी, रॉंग नंबर.” असे कसेबसे म्हणून मी फोन खाली ठेवला.

“ मूर्ख, महामूर्ख.” रीटा रागारागाने म्हणाली.

“ठीक आहे .ठीक आहे. उगाच ओरडू नको.”

“ मूर्खा, गाठ आशाशी आहे. तिने जर राकेशला सांगितले तर?”

“काही होत नाही. तिनी काही माझा आवाज ओळखला नाही!”

तेवढ्यात परत फोन वाजला. एका गोष्टीचे रीटाला क्रेडिट द्यावेच लागेल. ते म्हणजे तिने अतिशय शांतपणे फोन उचलला.

“मी रीटा बोलतेय. कोण आशा काय? खरच राकेश येतोय काय? ठीक, ठीक मी बघते.” तिने माझ्याकडे एकदा थंडगार नजरेनी बघितले. “कोण पवन काय? नाही राकेश सुरतला गेल्यापासून मी त्याला बघितले नाही. ती पीडा कुठे असेल ते मला माहीत नाही.” तिने फोन ठेवला. माझ्याकडे खाऊ का गिळू अशा नजरेने पाहीले, “काय मिस्टर परफेक्ट ? हेच का तुझे प्लॅनिंग ? घोळ घालायची एकही संधी घालवायची नाही असे ठरवले आहे काय ?”

“परत असे होणार नाही.”

“ न झाल्यास उत्तम आणि हा घोळपण आशाला भेटून तुझा तूच निस्तर.”

“ठीक आहे.” मी म्हणालो, “ आता मी मुंबईला जात आहे.

“कशाला?” मी तिला थोडक्यात बुबी ट्रॅपची माहिती सांगितली.

“हे तरी व्यवस्थित कर.”

“ रीटा आता आपण पार्टनर आहोत. राकेश जरा लवकरच परत येत आहे.मला जरा पटापट कामे उरकायला हवी.”

“काही घोळ न घालता कर म्हणजे झाले.”

चार जिने चढून मी ऑफिसमधे प्रवेश केला तेंव्हा आशा नेहमी प्रमाणे दाणदाण टायपिंग करत होती. मला बघताच तिने टायपिंग थांबविले व माझ्याकडे चांगले निरखून बघितले.

“ हाय, कशी आहेस ? मी इथूनच जात होतो म्हणून सहज डोकावलो.”

“मी तुलाच शोधत होते.”

“ परम भाग्य!”

“ रीटाने तुला काही सांगितले काय?”

“काय?”

“तू सकाळी तिथे नव्हतास काय?”

तिला संभ्रमात पडल्याचे बघून मला आनंद झाला.आता मी तयार होतो.

“ तिथे म्हणजे कुठे?”

“ माझा फोन तूच उचलला होता. पवन मी तुझा आवाज ओळखते. सायंतारासला सकाळी माझा पहिल्यांदा फोन उचलणारा तूच होतास.”

“ खरच की काय? मला वाटते मी त्यावेळी मुंबईला लजपत रोडवर माझ्या मैत्रीणीकडे होतो. किती वाजता ?”

“ दहा वाजता.”

“ मग तर अशक्यच. कारण त्यावेळी आम्ही एकमेकांच्या मिठीत होतो.”

दोन मिनिटे ती एकटक माझ्याकडे बघत राहिली नंतर अचानक म्हणाली की राकेश रात्री दहा वाजता येत आहे त्याला आणायला जा.

“ठीक आहे पण त्या आधी मी कुठे होतो याबद्दल स्पष्ट बोल. तुला जर असे म्हणायचे अस की मी राकेश नसतांना सायंताराला होतो तर मीच त्याला सांगतो की आशा असे म्हणत आहे म्हणून.”

“ नाही, मला असे म्हणायचे नव्हते.”

“मग कसे म्हणायचे होते ?”

“ पवन, सॉरी, माझा काहीतरी गैरसमज झाला असावा.”

“ठीक आहे.”

नीताकडे मी बाराच्या सुमारास गेलो. नीतानेच दार उघडले. तिला बघताच दोघींमधला फरक मला जाणवला. तोच जो मांजर आणि वाघिणीत असतो तो.

“पवन,तू?”

“होय मीच. आत तर येऊ देशील?”

“मला न सांगताच गेलास ना?”

“नीता, मला रडारड नको होती.”

“ आतातरी रहाणार आहेस ना?”

“ तीन तास. मी फारच कामाचा माणूस झालो आहे.”

“ पवन, तू कुठल्या भानगडीत तर अडकला नाही ना?”

“अजिबात नाही.”

“मला तुझ्या कामाबद्दल सांग.”

मी तिला राकेश व त्याला वाटणारी भीती, त्याचा सुप्रसिद्ध कोट याबद्दल सर्व सांगितले. अर्थात रीटाचा संदर्भ वगळून. राकेश हिऱ्यांचा व्यापार करतो हेही तिला सांगितले.सहज म्हणून मी तिला म्हणून गेलो की एकढा श्रीमंत असून पण हिरे कुठे ठेवतो हे कोणालाच कळत नाही.

“त्यात काय विशेष, त्या कोटातच असणार. नाहीतर कशाला तो चोवीस तास त्याला चिकटून असतो?” मी एकदम चमकलो आणि मी हिला मूर्ख समजत होतो.

“काय म्हणालीस?”

“ काही नाही. एक विचार मनात आला तो सांगितला.”

“नीता तू खरच एक हिरा आहे. हे सर्व आटपल्यावर आपण अमेरिकेला जाऊ.

नीता खुश.

----------------------*----------------------

## प्रकरण १२

सायंताराला पोचल्यावर रीटाने गेट उघडले. “तू आशाला भेटलास?”

“ होय आणि मी तिच्याकडून सॉरी वदवून घेतले.”

“ यायला बराच वेळ लागला.”

“ हो.तो बुबी ट्रॅप ज्याच्याकडे होता तो मित्र लवकर भेटला नाही”

लिपस्टिकचे डाग मी काळजीपूर्वक घालवले होते. अजून काही संभाषण वाढवायच्या आत मी बुबी ट्रॅप जोडायला घेतला. लाकडी पट्टया मी काटकोनात जोडल्या. त्या फळयांना दोन ड्रिल मारले.

“ रीटा , आतून रिव्हॉल्व्हर आणते? ड्रॉवरमधेच आहे.” तिने ते आणताच मी ते उभ्या फळीला व्यवस्थित लावले. “याचे तू काय करणार आहे?”

“ या गॅजेटमधे रिव्हॉल्व्हर लोड करून ठेवल्यानंतर ठराविक वेळाने ट्रिगर दाबल्या जातो. घड्याळयाच्या उलट सुलट गतीवर लोडिंग आणि अनलोडिंग होते.” मी तिला थोडक्यात समजावले.

तिने आणलेले रिव्हॉलव्हर मी घेतले व तिला हॉलमध्ये जायला सांगितले.

“ते कशाला?”

“मी तुझ्या डोक्याच्या तीन चार फूट वर सेटिंग करतो त्यामुळे गोळीबार हवेत होईल.

“ पवन,गोळ्या काढल्यात ना?”

“होय.”

“दाखव.” मी हातातील गोळ्या तिला दाखवल्या.

“ मला खात्री करायची होती की चुकूनही अपघात होणार नाही. मला हा एकंदरीच प्रकार धोक्याचा वाटत आहे. समजा सेटिंग चुकले आणि गोळी राकेशलाच लागली तर?”

“तसे काही होणार नाही. हॉलमध्ये जातेस ना की तुलाच गोळ्या मारेन याची भीती वाटते?”

“मी अशी काळजी जरुन घेईन की तू गोळी चालवूच शकणार नाही.”

राकेशला आणण्यासाठी की जरा लवकरच गेलो. विमान वेळेवर आले. काऊंटरवरची मुलगी, तिचे नाव रुबी होते. नवीन

दिसत होती. पण तिलासुद्धा राकेश आणि त्याचा सुप्रसिद्ध कोट माहिती होते.

राकेशने सर्वप्रथम रीटाची चौकशी केली. मी त्याला त्याची सर्दी कशी आहे आणि ट्रिप कशी काय झाली हे विचारले. आम्ही बोलतच कारपर्यंत पोचलो. पोर्टर आणि रुबी मागोमाग आलेच. राकेशने दोघांना टिप दिलीच.

“पवन, लवकर घरी चल. मला रीटाला बघायची फार उत्सुकता आहे.”

“ हे काय निघालोच आपण.” असे म्हणून मी गाडी सुरु केली. थोडे अंतर गेल्यावर मी राकेशला म्हणालो, “राकेश घरी पोचायच्या आत मला एक गोष्ट सांगायची आहे.”

“लवकर सांग काय ते ?”

“दिवसभर आपल्या घरावर दोन माणसे लक्ष ठेवून होते.” राकेश एकदम काळजीत पडला.

“ रीटाला माहिती आहे?”

“नाही, मी तिला सांगितले नाही.”

“छान केले. या अवस्थेत तिला कळायला पण नको.”

तो चांगलाच घाबरलेला दिसत होता. तेवढयात माझ्या नशिबानी मागे एक गाडी मला दिसली. त्यात नेमकी दोन माणसे

होती. मागे न वळून बघता मी राकेशला म्हणालो, “ हीच ती माणसे.” आणि एकदम स्पीड वाढवला.खरे म्हणजे त्या दोघांनी आमच्या डबड्याची दखल पण घेतली नव्हती. साधारण स्पीडनी पण त्यांनी आम्हाला मागे टाकले असते.ते जेंव्हा आम्हाला ओव्हरटेक करायला लागले तेव्हा मी राकेशला ओरडून खाली वाकायला सांगितले. तेवढीच वातावरण निर्मिती.

घरी पोचल्याबरोबर राकेश पळत आपल्या खोलीत गेला.

दहा मिनिटांनी रीटा हॉलमध्ये आली व म्हणाली की तू त्याला एवढे काय सांगितले की तो हॉलमध्येपण यायला तयार नाही. कशीबशी जेवणे आटपल्यावर मी त्याला म्हणालो, “ राकेश, रीटाजवळ बोलू नकोस बर. आतापण बाहेर दोन माणसे आपल्यावर लक्ष ठेवून आहेत असे वाटते.मी जरा बघून येतो.”

मी सरळ बाहेर गेलो आणि रीटाच्या खिडकीखाली उभा राहिलो.

राकेश जोरजोरात रीटाशी बोलत होता, "इथे राहणे म्हणजे शुद्ध मूर्खपणा आहे. आपण सगळे विकू आणि इथून जाऊ.”

-----------------------*-----------------------

## प्रकरण १३

दुसऱ्या दिवशी पण राकेशने त्याचे नाकपण खिडकीबाहेर काढले नाही. कागदावर सारखी आकडेमोड करत होता. बुबी ट्रॅप वापरायची गरज पडणार नाही असे मला वाटू लागले.

“राकेश, असे घाबरून कसे चालेल. आपण त्यांचा सामना करायला हवा.” त्याने कोरड्या पडलेल्या त्याच्या ओठावरून जीभ फिरवली.

“अरे बाबा जगलो वाचलो तर सामना करणार ना?”

“पण करणार तरी काय?”

“सगळे घरदार विकून हा देश सोडणार. इस्राएल, अमेरीका कुठेही जाईन.”

“पण धंदा?”

“ धंदा काय कुठूनही करता येईल. प्रथम जीव महत्वाचा.” राकेश म्हणाला व फोन करू लागला. “आशाला बोलावतोय.” मी तिथून उठलो व जाऊ लागलो तर त्यानेच सांगितले की रीटाला पण

सांग की आशा येत आहे. मी रीटाला भेटून तसे सांगितले. तिने एक सुटकेचा श्वास टाकला, “ पुढे काय?”

“आता आपल्याला सर्वात चाणाक्ष व्यक्तीशी सामना करायचा आहे. तिला थोडाजरी संशय आला तर आपली वाट लागेल.” मी म्हणालो.

“ तूच संभाळून वाग.” रीटा म्हणाली.

“ठीक आहे. परत तेच ते उगाळू नकोस आणि राकेशवर लक्ष ठेव. तो कुठे कुठे घरात जातो ते बघ.”

“ ते मला नको सांगायला.”

“बहुतेक बुबी ट्रॅप वापरायची गरज पडणार नाही असे वाटते.” मी म्हणालो.

“ ही सर्वात समाधानाची गोष्ट.” रीटा म्हणाली. तीन वाजता आशा आली. तिची व राकेशची पाच वाजेपर्यंत खलबत झाली. पाच वाजता दोघे बाहेर आले व राकेशने आम्हाला धक्का देणारी घोषणा केली.

“ मी इथेच रहाणार.”

मी आणि रीटा दोघेही जागीच थिजलो.

आम्हा दोघांकडेही बघत तो म्हणाला, “ उगीच कोणी अज्ञात माणसे धमक्या देत आहेत म्हणून सर्व फुकफाक करून अनिश्चित ठिकाणी जायला मी तयार नाही.”

“अगदी बरोबर. त्यातूनही पवन त्याचे रक्षण करायला समर्थ आहे हे पवनने वेळोवेळी सांगितलेच आहे.” आशाने री ओढली. “त्यातूनही त्याला शक्य वाटत नसल्यास आपण दुसरा कोणी बघू .” अशी वर बत्ती भरली.

“पवन, तू जाणार नाहीस ना ?” राकेश म्हणाला, “ मी तुझ्यावर विश्वास ठेवू शकतो काय?”

“अर्थातच.” मी दुसरे काय म्हणू शकत होतो? एवढे बोलून राकेश व आशा परत खोलीत गेले. रीटाने माझ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनी बघितले.

“ रीटा, आता आपल्याला बुबी ट्रॅप वापरण्याशिवाय पर्याय नाही.”

“मला तर ते फारच धोकादायक वाटते .”

“ इलाज नाही. त्या जाडीता घाबरवल्याशिवाय राकेश काही विचार बदलणार नाही.”

“पण ट्रॅप नीट चालला नाही तर?”

“काही होणार नाही. आपण मघाशीच बरोबर सेटिंग करून ठेवले आहे. सर्व गोळया वरतीच फायर होतील. तू फक्त आशाला व राकेशला बाहेर आल्यावर बोलण्यात गुंतव.”

“ राकेशलाच गोळया लागल्या तर ?”

“गप्प बस.”

साधारणपणे सहाच्या सुमारास राकेश व बाहेर आले. रीटापण हॉलमध्ये आली व आशाशी बोलू लागली. “राकेश, मी आशाला सोडून येतो.” मी म्हणालो.

“ जरूर जा. कार आण.” राकेश आता बराच सावरलेला दिसत होता. मी धावतच कार आणायला गेलो आणि कार बाहेर काढली व तसाच पळत जाऊन बुबी ट्रॅप ऑन करून आलो. मी हॉलकडे जात असतांच पहिली गोळी जोरात सुटली आणि खिडकीची काच फुटली. आशा जोरात किंचाळली. तोवर मी आत आलो होतो. मी काहीतरी ओरडायच्या आत दुसरी गोळीपण उडाली आणि चक्क लाकडी सोफ्यात घुसली व सगळीकडे लाकडाचे तुकडे उडाले. “सर्वजण जमिनीवर पालथे पडा.” मी जोरात ओरडलो.

तेवढ्यात आशा जोरात ओरडली, “ राकेशला गोळी लागली आहे.” मी राकेशकडे बघितले. त्याच्या मानेतून रक्त वाहत होते.

“अरे बापरे.” मी मनाशीच म्हणालो , “ मी यालाच ठार मारले की काय?”

“मूर्ख,महामूर्ख, गाढवा तू एकपण काम नीट करत नाही.” न राहवून रीटा किंचाळली. मी तसाच तिच्याजवळ धावत गेलो. तिला गदागदा हलवून तिचे तोंड दाबले. “ गप्प बैस, महामाये, नाहीतर तुला इथेच खलास करीन.” मी तिच्या कानात कुजबुजलो.

काय झाले ते माझ्या लक्षात आले होते. प्रत्येक गोळी उडाल्यावर रिव्हॉल्व्हरचे टोक खाली झुकत होते. एवढा विचार करेपर्यंत तिसरी गोळी माझ्या बाजूची फुलदाणी फोडून गेली होती. मी तसाच कसलीही पर्वा न करता ट्रॅपकडे पळत गेलो व रिव्हॉल्व्हर झटक्यात ओढून काढले आणि लाकडी फळया अडगळीच्या खोलीत फेकल्या आणि परत हॉलमध्ये आलो. राकेशच्या मानेतून रक्त वाहतच होते. मी राकेशजवळ जाऊन त्याला बसते केले. त्याची नाडी बघितली. ठीक चालत होती. श्वास जोराजोरात होत होता. एवढ्यात रीटाने फर्स्ट एड बॉक्स आणला. मी डेटॉलनी त्याची मान स्वच्छ पुसली, थँक गॉड, फक्त लाकडाचे काही तुकड़े जोरात मानेत घुसल्यानेच रक्तस्त्राव होत होता. मी हळुवारपणे सगळे तुकडे काढले. परत डेटॉलनी मान स्वच्छ पुसली. कापूस दाबून बसवतला व बँडेज केले.सैन्यातले ट्रेनिंग कामी आले. आता

रक्तस्त्राव थांबला होता. श्वासपण नियमित झाला होता. आशाने व रीटाने त्याला आधार देवून उभे केले व हळूहळू त्याच्या खोलीत नेले. मी हॉलमधला पसारा नीट गोळा केला, काचेचे, लाकडाचे तुकडे डस्टबिनमध्ये फेकले.

तेवढ्यात रीटा बाहेर आली व माझ्याकडे तीक्ष्ण नजरेने बघत म्हणाली, “हेच काय तुझे परफेक्ट प्लॅनिंग ?”

----------------------*----------------------

## प्रकरण १४

आता परत राकेश आणि आशा खोलीत खलबत करीत होती. वातावरणातील तणाव असह्य झाल्यामुळे मी सरळ गॅरेजमधे स्कॉचची बाटली घेऊन गेलो. अर्धी बाटली संपवल्यावर माझ्या अंगावर एक सावती पडली.

" कोण ?" मी म्हणालो.

"तुला तर आज स्वतःचा फारच अभिमान वाटत असेल. नाही काय?" रीटाचा आवाज आला.

"हे बघ, जे झाले ते झाले. पण त्या दोघांचीही गाळण तर उडाली. आता तो पळेल बघ."

"पळणारच आहे पण मूर्खा, सर्व तयारी आशा करत आहे !"

" त्यात काय झाले? आपला हेतू तर साध्य झाला."

"पण मला कसे कळणार तो काय बरोबर घेत आहे किंवा नाही ते?"

" तुच तर म्हणत होती आपल्याला पूर्ण आयुष्य आहे हे शोधत बसायला?"

“आशाने दहा वाजताचे विमान बुक केले आहे म्हणजे तो बरोबर काय नेणार हे मला कसे कळणार ?”

“ तुझे काय?”

“ मी नंतर जाणार आहे .”

“असे आहे तर, तो गेल्यावर मी इथे काहीही करून हिरे कुठे आहेत याचा शोध लावून तुला ठेंगा दाखवेल असे तुला वाटत आहे.”

“ तसे केल्यास तू जिवंत रहायची शक्यता नाही .”

“माझ्यावर विश्वास ठेव. मला तू आणि हिरे दोन्ही पाहिजे आहेत.”

तेवढ्यात खोलीचे दार उघडल्याचा आवाज आला म्हणून आम्ही दोघेही हॉलमध्ये गेलो. आशानी मला राकेश बोलावत आहे म्हणून सांगितले व ती रीटाशी हळू आवाजात काहीतरी बोलू लागली. मी आत गेलो तर राकेश बसून होता.

“ ये पवन, मी जायचे ठरवले आहे.”

“ सॉरी राकेश. मी माझ्या परीने प्रयत्न केला.” मी म्हणालो.

“ ठीक आहे.” असे म्हणून त्याने मला पैसे देण्यासाठी पाकीट काढले.

“ सॉरी राकेश, मी कमी पडलो. मला हे पैसे नकोत.”

“असे कसे? जे झाले ते झाले. तू तरी काय करणार होता ?” तो म्हणाला.

“ नकोच, मला पटत नाही.” मी परत म्हणालो.

“ तुझी मर्जी. आता शेवटची ड्यूटी, मला आणि रीटाला एअरपोर्टला सोडशील काय?”

“ जरूर तसेच माझ्याकडून पुढील सूचना येईपर्यंत गाडी व घर संभाळ .” राकेश म्हणाला.

आंधळा मागतो एक डोळा.

“तसे आशा लक्ष ठेवीलच म्हणा. तिने तसे कबूल केले आहे.” तो म्हणाला.

दुधात मिठाचा खडा पडलाच पाहिजे काय ?

-----------------------*-----------------------

# प्रकरण १५

राकेशनेच फोनवर आशाकरता कॅब बोलावली. रिकामा वेळ होता म्हणून मी गॅरेजमधे गेलो आणि रिव्हॉल्वर घासून पुसून साफ केले. बारुदीचा वास पूर्ण जाईपर्यंत ऑईलिंग केले व गोळ्या परत भरल्या.

तेवढ्यात कॅबचा आवाज आला म्हणून परत हॉलकडे येत होतो तर आशा घाईघाईने जातांना दिसली. मी हॉलमध्ये प्रवेश केला. राकेश चिंताक्रांत मुद्रेनी बसला होता. “ ये, कुठे गेला होतास ?”

“एक राउंड मारुन आलो.”

“कोणी दिसले काय पवन ? माझे रिव्हॉल्व्हर मला परत दे.”

“ एअरपोर्टला तुला सोडेपर्यंत माझ्याकडे असू दे.”

“ नको, आताच दे. रीटाला पाहिजे.” मी मुकाट्याने त्याला रिव्हॉल्वर दिले. त्याने चक्क नाकाला लावून बारुदीचा वास घेतला. उघडून गोळ्या बघितल्या. “ हे तर मी तुला जसे दिले होते तसेच आहे.”

तेवढ्यात तिथे रीटा आलीच. राकेश म्हणाला, “ तू चांगलाच अंगरक्षक दिसतो. एकही गोळी वापरलेली नाही.”

“मी तुला सांगितले होते. मला रिव्हॉल्व्हर चालवायला आवडत नाही.”

“ अगदी मालकाचा जीव जात असला तरी!” रीटा म्हणाली.

“बर ठीक आहे. उगीच वाद नको.” असे म्हणून राकेश गप्प बसला.

“ रीटा, मला त्यांना पकडण्यात जास्त स्वारस्य होते.” मी बचावाचा प्रयत्न केला.

“राकेश सुरतला जाईपर्यंत रिव्हॉल्वर माझ्याकडेच राहील.” तिने माझ्याकडे रोखून बघत तिने राकेशला सांगितले.

“ठीक आहे. पवन, तू नेहमीप्रमाणे गाडी चालव. चल रीटा आपण बाकीचे सामान घेऊ.” असे म्हणून तो व रीटा राकेशच्या खोलीत गेले.

थोड्यावेळाने फोनची रिंग वाजली. मी फोन उचलला. रुबी एअरपोर्टवरून बोलत होती.

“कोण राकेश काय?”

“ नाही.मी पवन बोलत आहे. राकेश कामात आहे. काही निरोप आहे काय?”

“होय. त्यांना सांगा फ्लाईट वीस मिनिटांनी उशीरा सुटेल.”

“ठीक आहे.” मी आत जाऊन राकेशला सांगितले की फ्लाईट वीस मिनिटे लवकर सुटणार आहे.

आम्ही साडेनऊऐवजी नऊ वाजताच एअरपोर्टवर पोचलो. जातांना रीटा व राकेश मागे बसले होते. रीटा रिव्हॉल्वरसह आणि राकेश कोटासह. मानेची जखम दिसू नये म्हणून राकेशने कॉलर दुमडली नव्हती, तरीपण लालसर बँडेजचा भाग दिसत होताच. एअरपोर्टवर पोचताच राकेशने मला आत जाऊन रुबीला बोलवायला सांगितले. मी त्याप्रमाणे रुबीला सांगायला आत गेलो तर ती एका प्रवाश्याशी काहीतरी हसून बोलत होती.

“ रुबी, राकेश बाहेर गाडीत बसला आहे.तुला बोलावत आहे.”

“ सॉरी,मि.मेहता, मी पाच मिनिटात आलेच.” ती त्याला म्हणाली व माझ्याबरोबर बाहेर आली.

“मला ताबडतोब विमानात बसव.” राकेश तिला बघताच म्हणाला. रुबीच्या चेहऱ्यावर गोंधळल्याचे भाव उमटले.

“पण राकेश फ्लाईटला उशीर असल्याचे मी तुम्हाला फोन करून सांगितले होते.” तेवढ्यात तिला राकेशचे बँडेज दिसले, “ आणि हे काय, तुम्ही तर जखमी दिसता, काय झाले?”

“ काय झाले त्याची काळजी करू नको. मला सांग तुझा फोन कोणी घेतला होता?”

“ मला वाटत, करण..”

“ पवन नाव आहे ते.” राकेश.

“बरोबर, पवन नाव सांगितले त्या व्यक्तिने.”

“साफ खोटे. मला कोणाचाही फोन आला नाही.”

“ पवन साफ खोटे बोलत आहे.” रीटा म्हणाली. तिच्याकडे दुर्लक्ष करून राकेश रुबीला म्हणाला, “मला आहे या अवस्थेत सुरतला जायचे आहे.काही अडचण?”

“अजिबात नाही, मी तुमची कार विमानापर्यंत न्यायची व्यवस्था करते. अजून विमान सुटण्याला बराच अवकाश आहे. तुम्ही सरळ आत जाऊन बसा म्हणजे कोणीही जास्त चौकशा करणार नाही.”

राकेशने होकारार्थी मान हलवली. तो म्हणाता, “ पवन, चल विमानापर्यंत कार घे.”

"सॉरी राकेश, इथून पुढचे तुझे तूच बघ. खोटारडा, थापेबाज, धांदरट ही सर्व बोलणी ऐकण्यासाठी मी काही तिथपर्यंत यायला तयार नाही. तसेही विमानतळापर्यंतच यायचा माझा वादा होता असे म्हणून मी गाडीतून उतरलो व खाडकन दार लावले आणि टॅक्सी स्टँडकडे चालू लागलो. काही अंतर चालून गेल्यावर मी हळूच तिरकी नजर टाकली. रीटा गाड़ी चालवायला बसली होती. गाडी एअरपोर्टच्या आत गेल्याबरोबर मी उलट दिशेला परत एअरपोर्टकडे चालू लागलो. हँगरच्या बाहेर विमान होते. रीटाने विमानापासून साधारण तीनशे फुटावर गाड़ी उभी केली होती. विमानाकडे जातांना हँगरच्या बाजूने एकदम अचानक हल्ला करून राकेशला सहज पकडता आले असते. पण हँगरकडे जातांना मला रीटा बघू शकत होती आणि तिच्याजवळ रिव्हॉल्व्हर होते. तरीपण मला धोका पत्करणे भाग होते कारण आता नाही तर कधीच नाही. नंतर मला राकेश कधीही मला भेटता नसता. मी लपतछपत हँगरच्या भिंतीपर्यंत गेलो व दबा धरून बसलो. रीटा गाडीतच बसली होती. राकेश खाली उतरला. एक छोटी सुटकेस हातात घेतली,रीटाशी काहीतरी बोलला, बहुतेक नंतर येण्याबद्दल बोलला असेल आणि सावकाश विमानाकडे जाऊ लागला. माझ्या जवळून तो जात असतांना मी त्याच्यावर झडप घातली व हँगरच्या सावलीत त्याला ओढले. मागून मी त्याचा डावा हात गच्च

पकडला व उजव्या हाताने त्याची मान गच्च आवळली. माझा विचार त्याला फक्त बेशुद्ध करुन कोट हस्तगत करणे ऐवढाच होता. म्हणून मी त्याची मान जास्त आवळली नव्हती पण राकेश माझ्या अपेक्षेपेक्षाही जास्त चिवट निघाला त्याने सुटण्याची जोरदार धडपड केली त्यामुळे नकळत मी त्याच्या मानेवरचा दाब आणखी वाढवला. एक बारीकसा श्वासनलिका तुटल्याचा कट् असा आवाज आला. क्षणार्धात माझ्या हातातील राकेशचे शरीर हळूहळू खाली घसरायला लागले.

“ पवन, तू त्याला ठार मारलेस.” मागून रीटाचा आवाज आला.

-----------------------*-----------------------

# प्रकरण १६

‘खून’

मी पेपरमध्ये ज्या खुनाच्या बातम्या वाचतो त्या नाही , माझ्या हातून झालेला. आता त्याचा तपास, खटले, शिक्षा सर्व काही माझ्याशीच संबधित असणार होते. मला भयानक भीती वाढू लागली.पाच मिनिटे माझ्या डोक्यात कोलाहल चालू होता.

“पवन " रीटा म्हणाली.

“ तू इथून जा नाहीतर तू पण अडकशील.” मी म्हणालो.

“पवन, मी तुला सोडून जाणार नाही. मी तुला यातून सुटण्याकरता मदत करीन.”

“ती कशी काय ? या विमानात जर आता राकेश बसला नाही तर लगेच चौकशी सुरू होईल.”

“ मला जरा दोन मिनिटे विचार करु दे.” असे म्हणून तिने मला पाणी दिले. ते माझ्याकडून अर्धे सांडले आणि अर्धे मी कसाबसा प्यालो.

“राकेशची व माझी चण सारखीच आहे. हा कोट घालून मीच सुरतला जाते .” रीटा म्हणाली. “ मी उद्या सकाळीच परतेन पण त्या आत तू राकेशच्या बॉडीची आधी आपण ठरवले होते तशी विल्हेवाट लाव. नंतर आपण हिऱ्यांचा शोध घेऊ .”

“ हे सर्व जमेल तुला एकटीला ?”

“ दुसरा पर्याय मला तरी दिसत नाही. आटप, लवकर कर, आपल्याजवळ वेळ फार कमी आहे.” ती म्हणत होती ते खरे होते. मी तिच्या मदतीने राकेशचा कोट काढला आणि तो तिने ताबडतोब घातला. केसपण तिने व्यवस्थित हॅटखाली दाबून बसवले. आता ती बरीचशी राकेशसारखीच वाटत होती. परत मी तिची मदत घेतली आणि राकेशची बॉडी डिकीत ठेवली.

“ पवन, संभाळून घरी जा. रस्त्यात अपघात करू नकोस.” रीटा म्हणाली.

डिकीत राकेशला ठेवण्याआधी तिने त्याचे बँडेज काढून स्वतःच्या मानेला गुंडाळायची खबरदारी घेतली होती.

‘जर रुबीला आठवलेच तर’ असे तिने स्पष्टीकरण दिले. सर्व उरकायला आम्हाला दहा मिनिटे लागली असतील.नंतर ती विमानात जाऊन बसली. मी तिला निरखीत होतो. राकेशचे सोंग तिला बऱ्यापैकी जमले होते.

ती शिडीच्या पायऱ्या चढून विमानात गेली. चेकलिस्ट वरून नावे बघणाऱ्या मुलीला तिचा अजिबात संशयपण आला नाही आणि ती आत गेली.

हळूहळू बाकीचे प्रवासी यायला सुरवात झाली. पंधरा मिनिटातच सर्व प्रवासी आले. मी गाडी वळवून एअरपोर्टच्या बाहेर निघू लागताच मला आशा धावत येताना दिसली. ती फारच दूर होती. मी कारमधून उतरलो व तिच्या दिशेने जाऊ लागलो. थोडे थांबून तिने एका अधिकाऱ्याला काहीतरी विचारले. त्याने विमानाकडे बोट दाखवले.

" आशा, काय झाले ? तू इथे कशी?"

" मला जाऊ दे. मला राकेशला अर्जंट भेटायचे आहे." ती म्हणाली.

"आशा, तो विमानात बसलापण आणि विमान सुटण्याच्या बेतात आहे." मी म्हणालो, " तुझ्या गतीने तू पोचायच्या आत तो सुरतला पोचेल. त्यापेक्षा काय आहे ते मला दे, मी त्याला ते पोचवतो."

"ठीक आहे." असे म्हणून तिने एक छोटेसे पार्सल दिले. मी ते खिशात घातले आणि मी धावत विमानापर्यंत गेलो. शिडी चढून

त्यान चेक करणाऱ्या मुलीला विचारले की मि.मेहता आत बसले आहेत काय ?.

दूरवरून आशा बघत असणार याची मला खात्री होती. त्या मुलीने सगळी नावे परत चेक करुन मेहता नावाचा कोणीही नाही हे सांगितले. मी खाली उतरताच शिडी बाजूला घेण्यात आली. मी तसाच आशाकडे पळत गेलो व पार्सल दिल्याचे सांगितले.तोवर विमान उडाले होते. आता बरीच शांत झाली होती. तिला यायला उशीर व्हायचे कारण म्हणजे येतांना तिच्या कॅबचा छोटासा अपघात झाला होता. तिच्या चेहऱ्यावर काही ओरखडे होते. तशीच ती थोडी लंगडत पण होती.

“माझी राकेशशी भेट होणे फारच जरूरी होते. पण या अपघातामुळे सगळा घोळ झाला.” ती म्हणाली, “ आणि रीटा कुठे आहे?”

आम्ही फारच लवकर आल्याने रीटा घरी गेली असे मी तिला सांगितले.

“ आता तू काय करणार आहे ?” तिने अचानक विचारले.

“ काही नाही. थोड्या वेळानी मुंबईला जाणार.” मी उत्तर दिले.

“ठीक आहे. आपण बहुतेक परत कधीच भेटणार नाही.” ती म्हणाली

“बरोबर आहे.” मी म्हणालो.

पण मी चूक होतो.

रात्रीच्या अंधारात सायंतारा अतिशय विचित्र आणि भीतीदायक वाटत होते. मी गाडी गॅरेजमध्ये ठेवली तेव्हा साधारणपणे अकराचा सुमार असावा. राकेशची विल्हेवाट लावण्याकरता मला अजून दीड तास तरी थांबावे लागणार होते. मी तसाच हॉलमध्ये गेलो. एक स्कॉचचा मोठा पेग बनवून हॉलमध्ये बसलो. तसा अजूनही झाल्या घटनेचा माझ्यावरचा परिणाम कमी झाला नव्हता. माझ्या हातून खून झाला यावर आणि डेड बॉडी गाडीच्या डिकीत आहे यावर माझा अजूनही विश्वास बसत नव्हता. नकळत मी रीटाची इच्छा पूर्ण केली होती. अचानक मला आशाने राकेशसाठी दिलेल्या छोट्या पार्सलची आठवण झाली. अजूनही ते माझ्या खिशातच होते. कंपासपेटीएवढे किंवा त्याहून थोडेसेच मोठे होते ते. थरथरत्या हातांनी मी ते उघडले. आतमध्ये कंपासपेटीसारखी एक लाकडी पेटी एका कागदी लिफाफ्यात ठेवली होती. मी हळूच ती पेटी लिफाफ्यातून बाहेर काढली व उघडली. आतमध्ये एक सुरेख सहा इंच लांबीची धारदार कट्यार

होती. तिच्या मुठीवर पातळसे चामडी आवरण होते. अजून काय आहे हे बघण्यासाठी मी लिफाफा उलटा करून झटकला तर त्यातून एक वर्तमानपत्राचे कात्रण खाली पडले. मी त्याची घडी उलगडली. कात्रण छोटेसेच होते. त्यातील बातमी अशी होती की कलकत्ता येथील एका नाईटक्लबमध्ये काम करण्याऱ्या बिपीन नावाच्या एका व्यक्तीचा खून झाला असून पोलिसांचा संशय रीटा नावाच्या त्याच्या महिला पार्टनरवर होता कारण आदल्यालच रात्री त्या दोघांमध्ये जोरदार भांडण झाल्याचे काही साक्षीदारांनी सांगितले होते. तसेच रीटा खून झाल्यानंतर फरार झाली होती व पोलीस तिच्या शोधात होते. आता मता उलगडा झाला की रीटा का सारखे राकेशला ठार मारण्याचा आग्रह करीत होती. कदाचित मुठीवरचे चामडी आवरण राकेशनेच तिचे ठसे पुसू नयेत म्हणून नंतर चढवले असावे. हा पुरावा राकेशजवळ आहे हे रीटाला माहिती असेल काय याचा मी विचार करू लागलो. पण बहुतेक नसेल नाहीतर तिने त्याला ठार मारण्याचा धोशा लावला नसता. राकेशने रीटाला लिहीलेल्या एकमेक पत्राचा पण संदर्भ आत्ता व्यवस्थित लागला. मी माझ्या खोलीत जाऊन ती पेटी कार्पेटखाली लपवली. अगदीच वेळ आली तर रीटाला शह देण्यासाठी माझ्याजवळ पुरावा होता.

रात्री बाराच्या दरम्यान फोनची रिंग वाजली. रीटा फोनवर होती. “ मी व्यवस्थित सुरतला पोचली. कोणालाही कसलाही संशय आला नाही.”

“ छान, आता पुढे काय ?”

“ सकाळी चारच्या फ्लाईटने परत येईन. मला घ्यायला सात वाजता एअरपोर्टवर ये.”

“जरूर, पण बँडेज आणि सुटकेसची तिकडेच वासलात लाव!”

“ तेच करीत आहे. तू राकेशच्या बॉडीचे ठरवल्याप्रमाणे केले काय?”

“ अजून नाही. हा फोन झाल्यानंतर तेच करणार आहे!”

“ लवकर कर आणि पीत बसू नको.”

फोनवर मी कितीही धीराचा आव आणला तरी हे काम करायच्या आधीच मला घाम फुटला होता. मी अजून अर्धी बाटली रिचवली. मग शांतपणे कामाची आखणी केली. काय काय वस्तू लागतील आणि त्या कुठे आहेत याची मनात उजळणी केली. काही सिमेंटचे वजनदार ठोकळे मी अडगळीच्या खोलीत बघितले होते. तिथेच जाड वायर आणि एक ढकलगाडीपण होती. सिमेंटचे

ठोकळे चांगलेच वजनदार होते. साधारण साठ-सत्तर किलोचा एक असावा. मी तसाच अडगळीच्या खोलीत गेलो. जाड वायर आणि एक सिमेंटचा ठोकळा कसाबसा उचलून ढकलगाडीत ठेवला व हळूहळू विहिरीकडे गेलो. तिथे पोचल्यावर तो ठोकळा परत काढून विहिरीच्या कठड्यावर ठेवला. नंतर त्या ठोकळ्याभोवती वायर करकचून बांधली आणि अर्ध्याहून जास्त वायर जमिनीवर मोकळी सोडली.

नंतर परत मी ढकलगाडी घेऊन गॅरेजमध्ये गाडीपाशी गेलो. आता सर्वात महत्वाचा व कठीण भाग पार पाडायचा होता. बराच धीर गोळा करून मी डिकी उघडली.

दोन तास उलटून गेल्याने राकेशचे प्रेत ताठरले होते. कितीही प्यालो असलो तरी ते बाहेर काढतांना माझा घाम निघाला. एकदा तर हे सर्व सोडून सरळ पळून जावे असे मला वाटले. पण एकदाचे ते बाहेर काढल्यावर पुढचे काम सोपे होते. मी प्रेत ढकलगाडीवर ठेवले. अंधूक चंद्रप्रकाश होता. फार्महाऊस एका टोकाला असल्यामुळे कोणी बघायची शक्यता नव्हती.

मी हळूहळू ढकलगाडी विहिरीपर्यंत आणली. प्रेत काढून त्याभोवती वायरच्या दुसऱ्या टोकाकडून वायर करकचून बांधली व ते पण कठड्यावर सिमेंटच्या ठोकळ्याजवळ ठेवले. आता

वायरच्या एका टोकाला ठोकळा व दुसऱ्या टोकाला राकेश होता. मी त्याचे प्रेत हळूच पाण्यात सोडले व त्यानंतर ठोकळा पाण्यात ढकलला.

-----------------------*-----------------------

## प्रकरण १७

सात वाजता मी एअरपोर्टवर पोचलो. गाडी बाहेर रस्त्यावरच पार्क करून रीटाची वाट बघत बसलो. पाच दहा मिनिटांनी ती येतांना दिसली. तिच्या हातात राकेशचा कोट होता. ती जवळ येताच म्हणाली, “ मला लौकर आत बसू दे. फार थंडी वाजते आहे.” ते तर तिच्या चेहऱ्यावरून स्पष्टच दिसत होते. अक्षरशः काळा निळा पडला होता.

“ रीटा, गाडी तुच चालव मी इथपर्यंत कसा आलो माझे मलापण माहिती नाही.” मी म्हणालो.

“पवन, सर्व ठीक झाले ना !”

“ होय. आता तो पाण्यात शांतपणे आराम करीत असेल.” ती ड्रायव्हींग करण्याकरता बसली व तिने कोट मागे टाकला.

“ काही अडचण आली काय ?”

“अजिबात नाही. एअर होस्टेसनी खूप मदत केली. अर्थात तो कोट सुप्रसिद्ध असल्याने असेल कारण राकेश व त्याचा कोट सर्वांनाच परिचित होते. नंतर मी शेजारच्याच हॉटेलमधून तुला फोन

केला. तसेच हॅट आणि बँडेज फेकले व परत एअरपोर्टवर आले. तासाभरात मला विमान मिळाले आणि मी इथे आले.''

''फारच छान''

''पण मला सारखे हा कोट कोठेतरी फेकून द्यावासा वाटत होते.पण तशी संधीच मिळाली नाही.''

'' बरे झाले तू तसे काही केले नाही ते. कारण हिरे कोटातच आहेत !'' मी चुकून बोलून गेलो.

''मी इतकी घाबरली होती की हिऱ्यांचा विचारपण माझ्या मनात आला नाही .

'' मी पण घाबरलो होतो. पण आता ठीक आहे.''

'' तू राकेशची संपूर्ण तपासणी केली होती काय ?''

'' तपासणी ? तो इतका भयानक दिसत होता की त्याला विहिरीच्या तळाशी कायमचा बुडवणे हा एकच विचार माझ्या डोक्यात होता.''

'' मूर्खा, त्यानी बेल्टमध्ये हिरे दडविले असतील तर ?''

''नाही. जे काही आहे ते कोटातच असणार !''

''जर नसले तर?''

“घरी गेल्यावर बघू.”

“बर, तू त्याचे खिसेतरी तपासले होते?”

“जरा डोक वापर, कोणी खिशात हिरे ठेवून फिरेल काय ?”

“ त्याचे प्रेत वरती तर येणार नाही ?”

“ जर ऐंशी किलोचा सिंमेंटचा ठोकळा जर तरंगायला लागला तर येईल.”

“ तरी पण मला वाटते तू एकदा संपूर्ण तपासायला पाहिजे होते !”

आता मला पण वाटायला लागले की तपासायला पाहिजे होते.

थोड्या वेळाने ती म्हणाली, “ आशाला काय झाले होते ? ती का आली होती ?”

“ ती राकेशला बाय करायला आली होती.पण ती दिसल्यावर खरच माझी गाळण उडाली होती. हे नशिबच म्हणावे लागेल की तिच्या कॅबचा अपघात झाल्यामुळे बयेला उशीर झाला. ती जर पंधरा मिनिटे आधी आली असती तर तिने मला रेड हँड पकडले असते.”

“ तू ते का केलेस?”

“ माझ्यासमोरून हिरे निघून जात असताना मी बघू शकत नव्हतो. मला त्याला मारायचे नव्हते. मी फक्त कोटाच्या मागे होतो. त्याला बेशुद्ध पाडून मी कोट पळवणार होतो. पण सगळेच फिस्कटले !”

“ आणि माझे काय ? तो विचार आला होता का मनात ?”

“मी नीट योजना आखली होती. नंतर मी तुला हिस्सा देणारच होतो.”

“ऐकून छान वाटते !” परत थोडा वेळ ती शांत राहिली नंतर म्हणाली, “ आशानी तुला काय दिले होते?”

मी तयारच होतो , “ तिने मला काही दिले नव्हते. तिने राकेशकरता काही पेपर आणले होते. मी ते तिच्या हातातून ओढून घेतले कारण कोणत्याही परिस्थितीत ती तुला भेटायला नको होती. नाहीतर तेव्हाच आपला खेळ खलास झाला असता.”

“ ते कसले पेपर होते ?”

“काही नाही. फक्त नाव आणि पत्ते असलेले दोन-तीन कागद होते मी ते पण विहिरीत टाकले.”

“असे काय ?”

मी खोटे बोलत आहे हे तिला समजत आहे की काय हे समजायचे माझ्याजवळ काहीतरी साधन पाहिजे होते.

“पवन .”

“बोल.”

“राकेश गेला हे एक प्रकारे बरेच झाले.”

“होय.”

“सॉरी, मी तुझ्याशी भांडले.”

“विसर ते.”

“तरीपण मी तुला मदत केली की नाही ? तूच सांग मला जर ती अचानक कल्पना सुचलीच नसती तर?”

“ खरे आहे. तू सांगायची गरज नाही.”

“ समज, माझ्यावर अशी वेळ आली असती तर तू असे केले असते?”

मला ती कट्यार व तिच्यावरचे रक्ताचे डाग आठवले.

“ का नाही? जरूर केले असते.”

“ बोलायला सोपे आहे, नाही काय ?”

दुपारी तीनच्या सुमारास रीटाने सर्व पडदे ओढून घेतले व आम्ही दोघे सोफ्यावर बसून कोट तपासू लागलो.

“बघूया आपल्याला काय मिळते.” मी म्हणालो.

तिने कोटचा एक खिसा दाबून बघायला सुरवात केली. अचानक ती म्हणाली, “इथे काहीतरी आहे.”

मी तिला हातानी बाजूला केले व स्वतः चाचपून बघितले.

“ जरा ब्लेड आण.”

“तूच आण.” दोघेही एकमेकांना क्षणभरपण नजरेआड होऊ द्याय ला तयार नव्हतो. शेवटी मीच माझ्या खिशातील पेपर कटरने अस्तर फाडले.

आतमधून पाचशेच्या करकरीत नोटा निघाल्या.

“या तर फारच कोऱ्या करकरीत दिसत आहे. वापरणे धोकादायक ठरेल.” ती म्हणाली.

अजून अर्धा तास आम्ही चिरफाड करत बसलो. काहीही मिळाले नाही. आम्ही एकमेकांकडे बघितले.

“ठीक आहे रीटा. आता जास्त वेळ न दवडता हिरे बाहेर काढ.” तिने एकदम रागीट मुद्रा केली. “म्हणजे काय?”

“ मला बनवू नकोस. कोट तुझ्याजवळ सहा तास होता. तूच हिरे लंपास केले आहेत. मुकाट्यानी बाहेर काढ.”

ती रागाने म्हणाली,” आणि मी काय समजून घ्यायचे काय की तू पाण्यात टाकण्याआधी राकेशला तपासले नाही .

तुला हिरे त्याच्या अंगावरच मिळाले असणार, आता तू उगीच नाटक करत आहेस.”

“ रीटा, मुकाट्याने हिरे दे नाहीतर मला जबरदस्तीने घ्यावे लागतील.”

“माझ्याकडे नाहीत!”

मी झपाट्याने तिच्याजवळ गेलो. तिचा डावा हात पिरगाळला. माझ्या ताकदीपुढे तिचा निभाव लागला नाही. तिने मुकाट्याने मला तपासणी करू दिली. तिची पर्सपण मी उलटी करून तपासली. तोपर्यंत ती धुसफूसत बसली होती.

“ रीटा, मला वाटते की हिरे अस्तित्वातच नसावेत.”

“ कशावरून ते तुझ्याजवळ नाहीत ?”

“ कारण जर ते माझ्याजवळ असते तर मी इथे नसतो. केव्हाच पसार झालो असतो. जरा डोके वापर.”

तिने स्वेटर घातला, केस नीट केले. मी रीटाला म्हणालो, “ तू फक्त वेळ वाया घालवत आहेस. तूच हिऱ्याबद्दल भुमका उठवली. तुला राकेश ठार व्हायला पाहिजे. असे समजू नको की मला काहीच माहिती नाही.”

“ काय माहिती आहे तुला?”

“ त्याची काळजी तू करु नकोस. तू माझ्याकडून त्याचा खून करवला. हिरे कुठेच नव्हते. तू गळ टाकला आणि मी गळाला लागलो.

“तुझी अजून उतरली नाही.”

“ एवढी चढलीपण नाही.” तिने समोरचा पाचशेचा ढीग माझ्याकडे सरकवला.

“हे काय अजून नवीन नाटक?”

“ हे घे आणि चालता हो. परत भेटू नकोस.”

“आणि तू मात्र नंतर हिरे पचवणार अर्थात जर मिळाले तर, असेच ना?”

“ तूच म्हणतो ना की हिरे नाहीतच . मग मिळण्याचा प्रश्नच कुठे येतो. तू जे म्हणतोस ते मला पटते. तरीपण मी त्यावर जुगार खेळायला तयार आहे.”

“ मी एक छोटा पेग बनवून रिचवला, “ तुला वाटते की पाचपन्नासाने माझे समाधान होईल.”

“ तुझ्या तर्कानुसार एवढेच असणार.”

मी त्या ढिगाचा अर्धा भाग तिच्याकडे सरकवला.

“हा तुझा हिस्सा, जोवर इथे कुठेही हिरे नाहीत अशी माझी खात्री पटत नाही तोवर मी इथेच राहणार, तू माझ्या तोंडावर पाचपन्नास फेकून दहा कोटीचे हिरे पचवू शकणार नाहीस. तूच काय कोणीपण.”

“ मला पैसा नको आहे.”कोणीही पाघळेल असे हास्य करीत ती म्हणाली, “ तू म्हणाला होता की तुला पैसे व मी दोन्ही पाहिजे, म्हणाला होतास ना? बघ इथे पैसे आहेत आणि मी पण.” असे म्हणत ती माझ्याजवळ आली. सकाळी उठलो तर माझे डोके ठणकत होते. ती ट्रे घेऊन आली. मला जागा बघून म्हणाली, “ मला तुला चकीत करायचे होते पण तू तर जागाच आहे.”

“असे होय. माझे डोके फारच ठणकत आहे.”

“ असणारच. म्हणून तर कडक कॉफी आणली आहे !”

ट्रे बाजूला ठेवून ती माझ्याजवळ बसली. तिने मला एक सिगरेटपण दिली.

“आज काय फारच सेवा चालली आहे?”

“ मला जो आवडतो त्याची मी चांगलीच काळजी घेते.”

अशीच बिपीनची काळजी करून त्याला हिने काळजीमुक्त केले होते. थोडी कडक कॉफी घेतल्यावर माझे डोके ठणकणे थांबले व माझे विचारचक्र चालू झाले.

आता राकेश विहिरीच्या तळाशी शांतपणे पहुडला असल्याने मला त्याची काळजी वाटत नव्हती. तो सुरतला गेला व तेथून परतला नाही असा पुरावा असल्याने पोलीस त्याला सुरतला शोधतील. विहीर शोधण्याचे त्यांना काहीच कारण नव्हते. तरीपण मला आशापासून धोका वाटत होता. जर मी सर्वात पहिल्या प्लॅनप्रमाणे वागलो असतो तर तिला काहीच संशय आला नसता. मी राकेशच्या खुनाबद्दल तसा फारच बेफिकीर झालो होतो. मला काळजी होती ती फक्त हिरे कुठे आहेत याची. कोटातून तिने तर ते आधीच काढले नसतील? तसेही वाटत नव्हते कारण कोठेही उसवलेले दिसत नव्हते. बेल्टमध्ये दडवून ठेवण्याची पण काही शक्यता वाटत नव्हती कारण तो नेहमी प्रवास करणारा माणूस होता. कस्टम अचानक तपासणी करेल या भीतीने तो असा धोका पत्करण्यातला नव्हता. पण बरोबर हिरे न घेता तो सुरतला जाईल असेही वाटत नव्हते. त्याला विहिरीत ढकलण्या आधी नीट

तपासायता पाहीजे होते असे मला राहून राहून वाटायला लागले. आता त्यावर एकच उपाय होता तो म्हणजे परत त्या पन्नास फूट पाण्यातून त्याला बाहेर काढून परत नीट तपासणे आणि नुसत्या त्या विचारानीच मला धडकी भरली. तेवढ्यात रीटा आल्याने माझी विचारमालिका थांबली.

“ बस आणि नीट ऐक.” मी म्हणालो, “ आपण आशाची काळजी घ्यायला पाहिजे !”

ती बसली व सावध होऊन ऐकू लागली. “ तू उद्या सकाळी मुंबईला जा व आशाला भेट. तिला ते पत्र दाखव आणि फोटो दाखव. ते सर्व राकेशच्या कपाटाच्या चोरकप्प्यात सापडल्याचे तिला सांग.रीटा, काहीही करुन तिची खात्री पटव, यावरच सर्व अवलंबून आहे. जर तू तिची खात्री पटवू शकली तर ती कदाचित हिरे कुठे आहेत हे सांगेल. इतक्या वर्षाच्या नोकरीमुळे राकेशचा फक्त तिच्यावरच विश्वास होता.”

“ मी जाईन.” रीटा म्हणाली.

रीटा दहाची लोकल पकडण्याकरिता निघाल्याचे मी खिडकीतून बघितले. जसा कारचा आवाज कमी झाला तसा मी कोट परत तपासायला घेतला. मी ब्लेडने सगळीकडे फाडून बघितले. अगदी खिशाचे पण अस्तर फाडले. सर्व काही पण कुठेही

काहीही मिळाले नाही. नीताबरोबर अमेरिकेला जायचे माझे स्वप्न हवेतच विरल्यासारखे मला वाटायला लागले. मी राकेशला पाच दहाहजाराकरिता मारले एवढाच निष्कर्ष मी काढला. कोट किंवा कोटाचे जे काही उरले होते त्याचा मी वायरने घट्ट बांधून एक गोळा केला. त्याच्याबरोबर एक जड दगड बांधला व विहिरीत फेकून दिला. तो पटकन तळाशी गेला. राकेशने शेवटीपण कोट बरोबर नेलाच असा विचार माझ्या मनात डोकावून गेला.

रीटा चार वाजता परत आली. मी धावत जाऊन गेट उघडले. तिचा चेहरा गंभीर होता.

"काय झाले?"

"काही सांगणे कठीण आहे. आत जाऊन बोलू."

आम्ही आत गेलो व दार लावून घेतले.

"तू तिची खात्री पटवली ?"

"मला तर तसे वाटते."

"वाटते पण खात्री नाही असेच ना?"

"ती मूर्ख नाही. ती अशी काही माझ्याकडे बघत होती की....."

"मला कल्पना आहे. ती स्वतःच्या आईवर पण विश्वास ठेवणार नाही. पण सांग तरी काय झाले ते."

“मी अभिनय तर चांगला केला. रडले पण. तिला ते पत्र, फोटो सर्व काही दाखविले. ती पांढरीफटक पडली होती.पत्र वाचल्यानंतर तर भयानक दिसत होती.”

“ पण तिचा विश्वास बसला काय ?”

“सुरवातीला नाही. ती म्हणाली तर नाही पण मी तिला सांगितले की राकेशच्या हॉटेलला फोन करून खात्री कर तेव्हा बसला.”

“ तिने फोन केला ?”

“ होय. हॉटेलच्या लोकांनी राकेश अजून आलाच नसल्याचे सांगितले, मी पण राकेशला नावे ठेवली. माझे आयुष्य त्याच्यामुळे बरबाद झाल्याचे सांगितले . आता मी कफल्लक आहे हे पण सांगितले.”

“ तू काय सांगितले ते जाऊ दे. ती काय म्हणाली ते सांग.” मी विचारले.

“ त्याचीच तर जास्त काळजी वाटते. ती काहीच म्हणाली नाही. ती फक्त खिडकीबाहेर बघत बसली .”

“नंतर काय झाले?”

“ मी विचारले त्याचे काही पैसे वगैरे तिच्या जवळ आहेत का? तर ती नाही म्हणाली. उलट मलाच सांगू लागली की आपण थोडे थांबू. कदाचीत राकेशकडून काही कळेल. मला वाटते अशी तिची खात्रीच आहे की राकेश मला सोडेल पण तिला सोडणे त्याला शक्य नाही.”

“तिला तुझा संशय येण्याची काही शक्यता ?”

“ अजिबात नाही.”

“ मग काही दिवस थांबू. नंतर तीच आपल्याला सांगेल.”

----------------------*----------------------

# प्रकरण१८

असाच आठवडा गेला. माझा आतापर्यंतचा सर्वात लांबलचक आठवडा, पूर्ण आठवडाभर पाऊस व वारे होते. नुसते बसून राहण्यापलीकडे आम्ही काहीच करू शकत नव्हतो.

रीटाला वाटत होते की मी अडगळीची खोली एकदा खणून बघावी. मला तेथील सर्व अडगळ दूर करून ते करायची तयारी नव्हती. शिवाय माझी खात्री होती की तिथे काही नाही. तसेच तिला हे पण वाटत होते की मी एकदा राकेशची बॉडी पाण्याबाहेर काढून परत एकदा नीट तपासावी. माझी त्यालापण तयारी नव्हती. इतक्या दिवसांनी भर पावसात त्याला बाहेर काढायच्या कल्पनेनी मला भीती वाटत होती. न जाणो काय अवस्थेत असेल तो.

आता सर्व काही आशावर अवलंबून होते. मला वाटत होते की एकदा तिची खात्री पटली की राकेश तिच्या आयुष्यातून निघून गेला आहे, तर ती नक्कीच आम्हाला काही हिऱ्यांबाबत ठावठीकाणा सांगेल, म्हणून आम्ही वाट बघत बसलो होतो.

कंपनी म्हणून रीटा भयानकच होती. ती अगदी क्षुल्लक कारणावरून चिडचिड करायची. तसेच माझे पण झाले होते. आम्ही कुत्र्यामांजरासारखे भांडत होतो. एखादा दिवस आम्ही अजिबात एकमेकाशी बोलत नसू. मी बाहेर पडायलापण घाबरत होतो. मी सायंताराला रहात आहे अशी पुसटशी शंका आशाला आली तर आमचे काही खरे नव्हते. बाहेर कारचा आवाज जरी आला तरी मी खोलीत पळत असे !

भरीस भर म्हणजे आमच्या जवळचे पैसे संपत आले होते. आठवड्याच्या शेवटी आम्ही पुरते कफल्लक झालो होतो. नवीन नोटा वापरायची आमची हिम्मत नव्हती. शेवटी आठव्या दिवशी मी तिला म्हणालो, " मी उद्या मुंबईता जाऊन येईन म्हणतो, काही पैसे आणायला पाहिजे. काही दिवसांनी सर्वच संपतील."

"कुठून आणणार?"

" एका मित्राकडे माझे काही येणे आहेत."

तिने संशयाने माझ्याकडे पाहिले. " रात्री परत येशील ना ?"

" शक्यतो. तो भेटला तर ठीकच आहेत. नाहीतर मी तुला फोन करेन."

“ पवन, मला फसवशील तर काय परिणाम होईल याच कल्पना आहे ना ?”

“ तुला काय वाटते मी कोण्या मुलीला भेटायला चाललो आहे?”

“ तसे करशील तर पस्तावशील.”

“ तू मला फारच ताप देत आहेस. तुझा तो मित्र बिपीन, त्याचे काय झाले ?”

“त्याचे आत्ता का विचारतोस?”

“फक्त खात्री करून घेत आहे की तो आसपास तर नाही. जशी तू माझ्या मैत्रिणीबद्दल शंकाखोर आहेस तसाच मी त्याच्याबद्दल.”

माझ्याकडे न बघता ती म्हणाली, “तो मेला आहे.”

“ मी कसा विश्वास ठेऊ ?”

“ तो आठ वर्षापूर्वीच मेला .”

“ कशानी, तू त्याला विष दिले काय ?”

“ तुला काय म्हणायचे आहे ?” तिने सावध होऊन विचारले.

“ गंमत करत होतो.” मी छद्मी हसून म्हणालो.

“ मूर्खासारखे बोलू नकोस.”

“ठीक आहे, लेडी मॅकबेथ .”

“ गप्प बस.”

दुसऱ्या दिवशी मी मुंबईला बारा वाजला पोचलो. आठ दिवसांनी मी मोकळ्या वातावरणात फिरत असल्यामुळेच की काय मी प्यायला सुरवात केली. भरपूर ढोसूनच मी नीताकडे गेलो तेव्हा चार वाजले असतील.

“नीता नावाची गोड़ मुलगी इथेच राहते काय ?” तिने दार उघडताच मी विचारले.

मला बघून तिला खरच आनंद झाला होता.किती फरक होता तिच्यात आणि रीटात.

“ पवन, किती दिवसांनी उगवलास .”ती म्हणाली.

“काय नीता, कसे काय चाललेय!”

“ हे काय पवन, ना फोन, ना पत्र. मी किती वाट बघते आहे.” तिने मला हाताला धरून आत नेले. त्याची गरज होतीच म्हणा.

“मी फारच कामात होतो आणि काळजी करू नकोस मी उद्या सकाळपर्यंत थांबणार आहे.” तिचा चेहरा आनंदाने उजळला. “ पवन, तुझे चालले तरी काय आहे?”

एका माणसाचा खून करून त्याला विहिरीत फेकला आहे हे थोडीच मी तिला सांगणार होतो.

“माझी नोकरी सुटली नीता.”

“ ओ, पवन!”

“काळजीचे तसे कारण नाही. राकेश सुरतला गेला आहे. त्याच्यामुळे त्याला आता अंगरक्षक नको ऐवढेच. पण त्यामुळे सध्या मी बेकार आहे.”

“तुझा काहीतरी प्लॅन होता. त्याचे काय झाले !”

“सध्या तरी जैसे थे आहे. राकेशचे सुरतमधील काम झाल्याबरोबर मला पैसे मिळतील. थोडे थांबावे लागेल एवढेच.”

नीताने डोळे विस्फारून माझ्याकडे बघितले, “पण तुझा त्याच्यावर विश्वास आहे का पवन ? तो पैसे देईल ?”

“ का नाही, ज़रूर देईल. जास्तीत जास्त महिनाभर थांबावे लागेल. नंतर आपण जाऊ.”

“ खरच जायचे आपण ?”

“अगदी खर. तर अजिबात काळजी करू नको. अगदी रितसर लग्न करून आपण जाऊ.”

“ केव्हा करायचे आपण लग्न ?”

“ जरा मला वेळ दे. मला एक काम मिळणार आहे.”

“ तोपर्यंत तू इथेच थांबणार आहेस ना?”

“ नाही, मला उद्या जावे लागेल. सध्या तर मला पैशाची गरज आहे.”

“ किती पाहिजे. माझे सगळे तुझेच आहे.”

“ सध्या तरी पन्नास हजार हवेत.”

“अरे मग आपल्याला लवकर बँकेत जायला हवे.” ती म्हणाली व चेक लिहू लागली.लिहिताना तिने अचानक विचारले, “ रीटा कशी आहे दिसायला?”

“चांगली आहे!”

“सुंदर आहे ?”

“ वीस वर्षापूर्वी असावी. मला कसे कळणार ? तेव्हा थोडीच मी तिला बघितले होते !”

“ म्हणजे ती वयस्कर आहे ?”

“ आता राकेशच साठीचा आहे म्हणजे ती निदान पन्नाशीची तरी असणारच.”

“ चल, आपण बँकेत जाऊ.”

नीतानी मला ताबडतोब पैसे दिले. नंतर मी माझा ढोसण्याचा कार्यक्रम परत सुरु केला. आता तर काय चलती फिरती बँक बरोबर असल्याने मी फारच सुटलो होतो.

“ पवन, आता पुरे झाले. चल आपण जेऊ या.” तिला माहिती असलेल्या एका चांगल्याशा हॉटेलमध्ये आम्ही गेलो. तिथे पण मी दोन पेग हाणलेच.

“ ती राकेशची सेक्रेटरी, आशा, तिला भेटला का एवढ्यात ?”

झाले, जिला मी विसरायला बघत होतो तिचीच हिने आठवण करून दिली.

“ नीता गप्प बैस. मेहरबानी करून त्या जाडीचे नाव काढू नकोस.”तेवढ्यात जेवण आले. मी सुरवात करणार तेवढ्यात माझे सहज बाजूला लक्ष गेले.

चार टेबलापलीकडे आशा बसली होती.

नंतर क्षणभर मला काहीच सुचले नाही. मी हळूच तिच्याकडे एक कटाक्ष टाकला. तिच्याबरोबर तिच्यासारखाच एक जाडा बसला होता. तिचा भाऊ असावा . दुसरे कोण येणार तिच्या बरोबर

म्हणा. तीपण इकडेतिकडे बघत होती. तिने आम्हाला पण एकदा बघितले पण पूर्ण दुर्लक्ष केले. पण दुसऱ्यावेळेस मात्र नीताला बघून ती चमकल्यासारखी वाटली.

एव्हाना आमचे जेवण अर्धवट झाले होते पण मी घामाघूम झालो होतो.

" पवन, तुला बरे वाटत नाही का?" नीताने विचारले.

"होय नीता. चल आपण निघूया. मला अस्वस्थ वाटत आहे !" मला आधार देत नीताने कसेबसे बाहेर आणले. नीताने एक कॅब थांबवली व आम्ही फ्लॅटवर परतलो.

इतक्या दिवसानंतर प्रथमच मला राकेश स्वप्नात दिसला. त्याने त्याचा भयानक कोट घातला होता आणि त्यातून पाणी ठिबकत होते. तसेच त्याच्या मानेला बॅंडेज होते. त्याचा चेहरा मंद चंद्रप्रकाशात भयानक दिसत होता. माझ्यासमोर बसून तो माझ्याशी बुद्धिबळ खेळत होता. तेवढ्यात अचानक ठकठक असा आवाज आला. " लक्ष देवू नकोस, एखादा बेडूक असेल, विहिरीतून बाहेर यायला बघणारा." राकेश म्हणाला.पण आवाज फारच जोरात येत होता.

एक जोरदार किंचाळी मारत मी उठून बसलो. मी पूर्णपणे घामाघूम झालो होतो. नीता उठली व तिने लाईट लावला.

“ वाईट स्वप्न पडले असणार पवन. किती घाबरला आहे ?”

“ नक्कीच, मी एवढी प्यायला नव्हती पाहिजे.”

“ जाऊ दे. झोप आता.”

पण मी रात्रभर जागाच होतो.

-----------------------*-----------------------

## प्रकरण १९

मी हळूहळू राकेश एन्टरप्राईझेसच्या पायऱ्या चढू लागलो. मला कल्पना होती की आशाला भेटणे फारच धोकादायक होते. पण हा धोका पत्करणे मला भाग होते. एवढ्या चुका झाल्याच होत्या अजून एकानी काय फरक पडणार होता. मला बघायचे होते की नीताला तिने ओळखले की काय ते. जर ओळखले अशी माझी खात्री पटली तर मी सरळ नीताबरोबर तिच्याच पैशानी सरळ पळून जायचे ठरविले होते. आशा पोलिसांकडे जायच्या आत हे मी करू शकलो असतो.

यावेळेस टाईपरायटर थंड होता. आशा शांतपणे फोनशेजारी बसली होती. ती बहुतेक राकेशच्या फोनची वाट बघत होती. तिच्या टेबलवर कसलेही पत्र, पसारा काहीही नव्हते, ती खिडकीबाहेर बघत बसली होती. मी तिला म्हणालो, “ आशा, तू अजूनही इथेच आहे? काय चालले आहे ?”

“ तुला काय पाहिजे ?” तिचा चेहरा निर्विकार होता.

मनातून मला तिला ठार मारावेसे वाटत होते. ऑफिस निर्मनुष्य होते. मी तिला मारले असते तर दोनतीन आठवडे कोणाला कळलेपण नसते.

त्याऐवजी मी तिच्याकडे नुसताच एकटक बघत बसलो.

"इथून चाललो होतो. म्हटले बघावे काय चालले आहे. राकेशबद्दल तुला काही कळले का? काल तुलापण तुझ्या भावाबरोबर बघितले होते."

"असशील."तीच निर्विकार मुद्रा.

"तू मला नाही बघितले ? मी तुला हात केला होता !"

"नाही. मी तुला बघितले नाही."

ती खोटे बोलत आहे की काय हे मला नीट ठरविता येत नव्हते पण जर तिने बघितले असते आणि त्यातूनही नीताला ओळखले असते तर तिच्या डोळ्यात विजयाची झाक नक्कीच दिसली असती. पण ती निर्विकार होती. मला थोडे हायसे वाटले.

"मग काल बरोबर होता तो तुझा भाऊ होता काय ?"

" तुला त्याच्याशी काय करायचे आहे?"

" काही नाही. मग मी ऐकले ते खरे आहे काय?"

“ काय ऐकले ?”

“ रीटा भेटली होती. ती म्हणत होती की राकेश एका तरुणी बरोबर पळाला म्हणून !”

“ त्याच्याशी तुझा काहीही संबंध नाही.” कमीतकमी ती नाकारत तरी नव्हती.

“ संबंध नसू दे पण मी इथे काम करत होतो म्हणून विचारले. पण आता तू येथे एकटीच बसून काय करत आहे? राकेशने तुझी काही व्यवस्था केली की नाही ?”

“ काही केली नाही आणि आता चालता हो.”

“ दहा वर्षे तू त्याच्याबरोबर काम केले आहे. तो तुला एकदम वाऱ्यावर सोडून देईल असे मला वाटत नाही. मिसेस राकेश म्हणत होती की तिच्याकरता त्याने काहीच पैसाअडका ठेवला नाही. पण तुझी गोष्ट वेगळी आहे. ती अचानक बारीक डोळे करून मला निरखून बघू लागली.

“माझी गोष्ट कशी काय वेगळी आहे ?”

“ तुला माहिती नाही ? राकेश व रीटाचे तो जाण्याच्या आधी भांडण झाले होते. रीटाला मूल होऊ शकत नाही हे त्याला कळले होते. बहुतेक त्यामुळेच त्याने हा टोकाचा निर्णय घेतला. कदाचित

दुसरी स्त्री तरी आपल्याला मुल देईल असे त्याला वाटत असावे, ती खुर्चीत थोडीशी पुढे झुकून बसली. माझ्याकडे रोखून बघत तिने विचारले,

“त्यानी मला हे सांगितले नाही. रीटाला का मुल होणे शक्य नाही ?”

“मी काय सांगू ? काही स्त्रियांना मुल नाही आवडत. कदाचित तिला राकेश आवडत पण नसेल. मला अंधुकशी पण कल्पना नाही. पण ती त्याला तसे ओरडून सांगत असतांना मी ऐकले आहे.”

ती परत खिडकीबाहेर बघू लागली. मी तसाच रेटून परत म्हणालो, “ पण तो परत येईल असे तूला पण वाटत नाही. खरे आहे ना ?”

“ खरे आहे.”

“इतकीपण निराश होऊ नकोस. कदाचित तो तुला काही रक्कम पाठवेल.”

तिने काहीच उत्तर दिले नाही.

“मी रीटाला सांगितले की राकेशजवळ काहीच पैसा नव्हता. शेवटी काही झाले तरी तो एक मामुली व्यापारी होता.” हे ऐकताच

मी जणू काही तिच्या वर्मावर बोट ठेवावे अशी ती कळवळली आणि म्हणाली, “ येथेच तू चुकत आहेस. तो चांगलाच पैसा बाळगून होता.”

“ तू कशाला खूप पैसा म्हणते त्यावर ते अवलंबून आहे. परिमाण बदलू शकते. नक्की किती ?”

“ त्याच्याशी तुला काय घेणे आहे ?”

“तू चिडलीस. याचाच अर्थ तो एक सामान्य व्यापारी होता. इतका सामान्य की तुला पण त्याची खात्री नाही."

ती संतापाने लाल झाली. “तू कधीही मिळवू शकणार नाही हतका पैसा त्याच्याकडे होता.”

“ माझ्या अंदाजाने तो फारतर पाचदहा लाखाचा पैसा बाळगून होता.”

“ तो दहा कोटीच्या वर पैसा बाळगून होता. त्यातले एक कोटी तो मला देणार होता. मी जे काही त्याच्याकरता इतकी वर्ष काम केले त्याचा मोबदला म्हणून एक कोटी मला देणार होता आणि आता माझ्याजवळ एकपण पैसा नाही.”

“ इतका पैसा तो काही बरोबर घेऊन देश सोडू शकत नाही. तुला माहितीच असेल की त्याने पैसे कुठे ठेवले असतील. का स्वतःकरता त्यातले काढून घेत नाही? ”

आता ती रडायला लागली होती.

डोळे पुसतांना तिने रुमालामागे आपला चेहरा लपवला. “ त्यानी त्याचे हिरे खरेदी केले होते. आता चालता हो!”

मी माझा श्वास रोखून धरला. अजून थोड़े असेच रेटून बोलल्यास मला पाहिजे ती माहिती मिळणार होती. “काहीतरी बोलू नकोस. तो हिरे कसे बाहेर नेणार ? तो स्वतःच्या सावलीलापण घाबरायचा.पकडल्यास पंधरा वर्षे खडी फोडायला गेला असता. एवढा काही तो धाडसी नाही.”

“ तू त्याला मूर्ख समजायची चूक करत आहेस.” ती किंचाळली. ती संतापाने लाल झाली होती. डोळ्यातून पाणी वाहत होते. “ गेली दहा वर्षे तो सुरतेला हिरे न्यायचा व आणायचा. हिरे त्यानी त्याच्या कोटच्या बटणांमध्ये लपवले होते.”

माझे जसे हृदय थांबले. मी पांढराफटक पडलो. कोटची बटणे सोडून बाकी सर्व भाग आम्ही तपासला होता. बटणे, जाडी, मोठी बटणे, सहा समोरच्या बाजूला, सहा आत आणि चार प्रत्येक बाहीवर.

“ फारच हुशार, खरच फारच हुशार !” माझा आवाज मलाच ओळखू येईना.

“ होताच तो हुशार! आता चालता हो. परत येथे येऊ नकोस आणि यापासून दूर रहा.”

“ ठीक आहे. तू म्हणते तसेच मी वागेन.” मी दाराकडे जात म्हणालो. “ पण गुड लक, तुला त्याची गरज आहे.” मी जाईपर्यंत ती रडत होती.

मी बाहेर जाऊन शेजारच्या बारमध्ये बसलो. मला भयानक धक्का बसला होता. मला विचार करायला वेळ पाहिजे होता. जे काही करायचे होते ते मला लवकर करायचे होते. सर्वप्रथम रीटा घराबाहेर चारपाच तास तरी राहील अशी युक्ती करायला पाहिजे होती. नंतर निदान शंभर फुट खाली सोडण्यासाठी गळ व दोर, त्यानंतर कोट परत वर काढणे, तसेच त्याची बटणे काढून माझ्या कोटावर शिवणे. त्यानंतर नीता बरोबर पसार होणे. नंतर सरळ दिल्ली, असे मी ठरविले.

माझा विश्वासच बसत नव्हता की आशाने हिऱ्यांचा ठावठीकाणा रागाच्या भरात का होईना पण सांगितला. बहुतेक राकेशबद्दलची मी सांगितलेली कथा तिला पटली असावी. कोट विहिरीत फेकल्याबद्दल मी स्वतःलाच दूषणे देऊ लागलो. नंतर मी नीताला फोन लावला.

“ओ पवन, मी तुझाच विचार करीत होती.”

“ एक शब्दही बोलू नकोस. मी काय सांगतो ते नीट ऐक. मला वाटत आहे की राकेशचा डील पूर्ण झाला आहे. तू दिल्लीची दोन तिकिटे काढून ठेव. तसेच तुझी पण सर्व आवरासावर करून ठेव.”

“ पण इतक्या लवकर सगळे कसे करणार? माझे कॉन्ट्रक्ट चालू आहे. मला रितसर नोटीस द्यायला पाहिजे.”

“ हे तर फारच वाईट झाले म्हणजे मला एकट्यालाच जावे लागणार असे दिसते. या जास्तीत जास्त या आठवड्याच्या शेवटपर्यंत मी थांबू शकेन. तू पाहिजे तर नंतर ये.”

“पण,”

“ हे बघ, आहे हे असे आहे.”

“ठीक आहे, मी तयारी करते.”

“छान, फ्लॅटचीपण काळजी करू नको.काय मिळेल त्याची तिकिटे काढ. पैसे सध्याचे तुझ्याजवळचे वापर.”

“ पवन,काही झाले आहे काय ? तू कशात अडकलास तर नाही ?”

“ काही झाले नाही आणि तू अजून शंका काढू नकोस.”

“ पण हे जरा घाईत होते.”

“ तुला माझ्याबरोबर यायचे आहे की नाही ?”

“ मग मी सांगतो तसेच कर.” आणि मी फोन खाली ठेवला.

सायंताराला मी तीनच्या सुमारास पोचलो. मी कार गॅरेजमध्ये ठेवेपर्यंत रीटा मला दिसली पण नाही. चूक माझी होती. मी तिला एक साधा फोनपण केला नव्हता. मी हॉलमध्ये प्रवेश केला तेव्हा ती सोफ्यावर बसली होती.

“ तू परतल्याबद्दल मला आश्चर्य वाटते !”

“ वाटू दे आणि आल्याबरोबर सुरवात करू नको.मी फोन करायचा प्रयत्न केला पण लागला नाही.”

“ अजून खोटे बोलू नको.”

“ सॉरी.मी पैशाच्या विवंचनेत होतो. मला वाटले होते त्यापेक्षा जास्त कटकटीचे काम होते ते.”

“ म्हणजे तूला पैसे मिळाले नाहीत ?”

“ नाही. मित्र भेटलाच नाही. सकाळी परत त्याला गाठायचा प्रयत्न केला. तरीपण काही यश आले नाही !”

“ म्हणजे तू हात हलवत परत आला " ती तिरस्काराने हसली. “ तुझ्या मैत्रीणीशी तू नीट वागला असता तर तिनी पैसे दिले असते.”

“ आपण भरपूर अडचणीत आहोत त्याचा विचार कर आणि फालतू बडबड बंद कर.”

ती ताडकन उठून उभी राहिली. “ तू नंबर एकचा खोटारडा आहेस.”

“ बस कर. तू कल्पना करत आहे तसे काहीही झाले नाही. मी खरच पैशाच्या मागे होतो.”

“ संपूर्ण दिवसभर आणि रात्रीपण ?”

“ तसे समज आणि मला एकटा सोड !” ती तशीच रागाने माझ्याकडे बघत राहिली. थोड्या वेळाने त्यातला फोलपणा तिच्या लक्षात आला असावा.

“ जर मला कधी खरे कळले ना तर ..”

“ माहिती आहे, माहिती आहे. आता पैशाबद्दल काय करायचे ते ठरव !”

“ त्या नवीन नोटा वापरू.”

“ नको, आशाला संशय येईल, इतके दिवस तू तिला पैसे मागत होती आणि आता मागणे बंद करशील तर तिला अजूनच संशय येईल.”

“ मग राकेशला विहिरीतून बाहेर काढ आणि हिरे शोध.”

“ माझी पक्की खात्री होत नाही तोवर मी हे करणार नाही. रीटा हिरे तूच शोधून काढू शकतेस.”

“ ते कसे ?”

“ आशाला भेट, तुझी दशा तिला वीट येईपर्यंत ऐकव. कदाचित ती काही सांगेल. नवीन नोटापण कोटात मिळाल्याचे सांग म्हणजे नंतर आपण त्या तरी वापर शकू. ती माझ्याकडे एकटक बघत राहिली, "ठीक आहे. मला वाटते हे करून बघायला हरकत नाही.”

संध्याकाळी मी माझ्या खोलीत गेलो. दार उघडल्याबरोबरच रीटाने माझ्या खोलीची पूर्ण तपासणी केल्याचे माझ्या लक्षात आले. सर्व वस्तूंची जागा बदलली होती.

मी दार बंद केले व जेथे पार्सल लपवून ठेवले होते ती जागा तपासली.

पार्सल तेथे नव्हते.

----------------------*---------------------

# प्रकरण २०

मला वाटले होते रीटा सकाळी लवकर जाईल. पण ती बारा वाजेपर्यंत गेलीच नाही. लवकर जाण्यात अर्थ नाही म्हणून उशीरा जाऊन, आशाशी बोलून लगेच परतेन असे ती म्हणाली. मी तिच्या जाण्याचीच वाट बघत होतो. न राहवून शेवटी मी तिला म्हणालो, “ रीटा ,लोकल पकडायची असेल तर तुला घाई करायला हवी.”

“ मी जावे अशी तुझी फारच इच्छा दिसते.” ती म्हणाली, “ मला अजून एक तास तरी लागेल.”

“ जेवढा उशीर होईल तेवढा ....” पुढे काय बोलावे ते मला सुचले नाही.

“ जा, तू तुझे काम कर. उगाच माझ्या मागे लागू नको.” ती म्हणाली.

मनाशीच विचार करतांना मला वाटत होते समजा कोटाऐवजी राकेशलाच गळ अडकला तर. शहारा येऊन मी हा विचार झटकला.

साडेअकराच्या दरम्यान रीटा तयार होवून बाहेर आली. मी गेट उघडले.

“ मी पाचपर्यंत परत येईन.” म्हणजे माझ्याजवळ पाच तास होते.

“ रीटा, काम करूनच ये.”

तिने इंजिन सुरु केले. “जरूर. तू काही नवीन उद्योग करू नकोस ?” मी कसाबसा हसलो.

“ इथे काय करणार ?”

“ दूधवाला येईल. दूध घेवून ठेव.”

“ओके. गुड लक अँड गुड बाय.”

“ गुड बाय.”

‘गुड बाय फॉरएव्हर.’ मी मनात म्हणालो.

कारचा आवाज कमी झाल्याबरोबर मी अडगळीच्या खोलीत पळत गेलो. पटकन मी तिथे मी मुंबईहून येतांना आणलेला गळ व दोरी जेथे लपवून ठेवले होते तेथून बाहेर काढले. ते घेऊन पळतच मी विहिरीपाशी गेलो. दूधवाला यायला अजून अर्धा तास होता. नशिबाने जर साथ दिली तर तेवढ्या वेळात पूर्ण काम होऊ शकत होते. काही क्षण मी विहिरीतल्या शेवाळ असलेल्या पाण्याकडे

एकटक बघत राहिलो आणि माझ्या पोटात ढवळून आले. अचानक पाण्यातून एका बेड़काने उडी मारली. मी भयानक दचकलो, भीतीने नखशिखांत घामाघूम झालो आणि पळत घराकडे परतलो. मी एक लार्ज पेग बनवला व गटगट प्यालो. मी अडगळीच्या खोलीतून एक जाळी काढायला वापरणारा लांब काठीचा झाडू शोधला व परत विहिरीकडे निघालो तेवढ्यात दूधवाल्याच्या गाडीचा आवाज आला. म्हणून परत थांबलो.

नंतर हळूच कानोसा घेतला, सर्व शांत होते. मी विहिरीपाशी पोचल्यावर लांब काठीच्या झाडूने बेडूक हाकलला.नंतर हळूच गळ दोरीच्या टोकाला बांधून आत सोडला. तेवढ्यात मागून आवाज आला, “ हॅलो, काय चाललेय ?”

मी ज्या स्थितीत होतो तसाच थिजलो . कोण आहे हे पण बघण्याचे पण माझ्यात धैर्य नव्हते.

“पाण्याचा किती घाण वास येत आहे. काहीतरी करायला पाहीजे.” मी हळूच मागे बघितले,तोच इलेक्ट्रिशियन होता. माझ्यापासून आठ दहा फूट अंतरावर उभा राहून माझ्याकडे एकटक बघत होता.

“ सॉरी, मी तुला दचकवले. मी घराची बेल वाजवली, कोणी दार उघडले नाही. कोणी दिसते का हे बघण्यासाठी मागे आलो, तर तू दिसला.”

मी काही बोललो नाही. माझा घसा कोरडा पड़ला होता. जीभ टाळूला चिकटली होती.

“काहीतरी पाण्यात पडले आहे ?” मी कसाबसा हो म्हणालो.

“ जरा सांभाळून बाबा. हा वास फार धोकादायक असतो. असल्या पाण्यामुळे साथीचे रोग होवू शकतात.”

“ मला कल्पना आहे.”

त्याला जरा अस्वस्थ वाटू लागले. माझी अवस्था त्याला शंकास्पद वाटू लागली.

“ काही गडबड नाही ना ?”

“ काही नाही. तुम्ही अचानक आल्याने मी दचकलो एव्हढेच.”

“ मला वाटलेच तसे. मी तसे करायला नको होते. या विहिरीत कोणी कुत्रा जरी मारून टाकला तर मला आश्चर्य वाटणार नाही. मी दिल्लीला होतो तेव्हा...” त्याची टकळी सुरू झाली,

मी पूर्णपणे दगड होऊन ऐकत होतो. तेवढ्यात तो विहिरीत डोकावला.

“ अरे इथे तर एक बेडूक दिसत आहे आणि हा गळ तुझा आहे ?” मी काही बोलायच्या आत त्याने

गळाला एक हिसका पण दिला, " अरे गळाला काहीतरी अडकलेले दिसते. बरेच जड वाटते .”

मी त्याच्या हातून दोरी ओढून घेतली. माझ्या थंडगार हाताच्या स्पर्शाने तो दचकून थोडा मागे सरकला.

“ तुम्हाला काय पाहिजे ?” मी विचारले. तर माझ्याकडे चकीत होऊन बघू लागला.

“ हे बघा मी कामात आहे. तुम्हाला काय पाहिजे ते सांगा.” मी म्हणालो.

“ मला साहेबांना भेटायचे आहे.”

“ दोघेही सुरतला गेले आहेत.”

“ खरच ? मी मॅडमला सकाळी गावात बघितले.”

“ तेव्हाच ती सुरतला जात होती.”

“ मला भेटणे जरुरी होते. बोर्ड तयार आहे केंव्हा बसवायचा ते सांगा आणि थोडा ऍडव्हान्स पाहिजे होता.”

मी मुकाट्याने पाचशेच्या दोन नोटा त्याला दिल्या.

“ अरे वा. पण मॅडमला जरूर सांगा की आलो होतो.”

“ जरूर सांगेन. आता मला माझे काम करू द्या.” मी त्याच्यावर ओरडलो.

“ अरे हो बाबा. जरा नीट सांग की.” असे म्हणून तो गेला.

गळ खरच फार घट्ट अडकला होता. जसजसा मी तो ओढायचा प्रयत्न करत होतो तो आणखीनच घट्ट व्हायचा. मला खात्रीने वाटू लागले की गळ बहुतेक राकेशलाच अडकला असावा. हताश होऊन मी दोरी सैल सोडली व थोडावेळ थांबलो. मला त्याला तर बाहेर काढायचे नव्हते.

थोड्यावेळाने गळ थोडा सैल झाल्याचा आवाज आला. मी एक जोरदार झटका दिला व गळ सुटा झाला. परत मी ती ठरावीक जागा सोडून विहिरीत जवळपास अर्धा तास गळ फिरवीत बसलो. नंतर कशालातरी गळ लागल्याचे मला जाणवले. मी परत गळ मागे पुढे असा फिरवला. त्याचे काटे अडकल्याचे पण मला जाणवले. नंतर हळुवारपणे मी दोरी वर खेचू लागलो.

दहा मिनीटांनी राकेशचा सुप्रसिद्ध कोट विहिरीबाहेर आला.

तोपर्यंत दोन वाजले होते. मी कोट घरात नेऊन किचनटेबलवर नीट अंथरला. त्यांची सगळीली बटणे उपसून काढली. सर्व मिळून बारा मोठी व आठ छोटी बटणे होती. नंतर मी कोट घडी घालून खुर्चीवर ठेवला व बटणे टेबलवर ठेवली.

माझे हात थरथरत होते. तरीपण कसाबसा मी एक नटक्रॅकर शोधला. एक बटण त्यात धरले व जोरदार दाब दिला . बटण उडून टेबलाखाली पडले. स्वतःलाच शिव्या घालत मी ते परत उचलले व यावेळेस नीट दाब देवून फोडले. आतमध्ये काहीही नव्हते. एकामागे एक मी सर्व बटणे तोडली. कोणत्याही बटणात एकपण हिरा नव्हता.

आशाने मला बनविले होते. तिने लावलेल्या सापळ्यात मी अलगद सापडलो होतो. राकेशचे काहीतरी बरेवाईट झाले असावे असा तिने अंदाज केला असावा. नाहीतर मला असे तिने का सांगितले असेल ? साधा तर्क, जिथे राकेश असेल तिथे त्याचा कोट असणारच.

कोणत्याही क्षणी ती पोलीस घेऊन येण्याची शक्यता होती.

मी माझ्या खोलीत धावत गेलो. माझे सामान व त्या नव्या नोटा मला घ्यायच्च्या होत्या. मी भराभर सुटकेसमध्ये कपडे कोंबत

असतांना मागे आवाज आला. रीटा दारात उभी होती. तिच्या चेहऱ्यावर छद्मी हास्य होते व हातात राकेशचे रिव्हॉल्व्हर.

" हॅलो पवन."

काय बोलावे हे मला सुचेना. मला ती मारणार हे तर स्पष्टच दिसत होते.

"अजिबात हलू नकोस. तुला आशाने बनवले. खरे ना ? तिने सांगितले की हिरे बटणात आहे आणि तू फसलास. मला बघायचे होते की तू कोट कसा काढणार आहे ते. तुला वाटले की हिरे मिळाले म्हणजे आपण पसार होऊ आणि मी हात चोळीत बसेल. आशा आणि आशापेक्षा मी तुला असेच जाऊ देईल असे तुला कसे वाटले ? मला सकाळीच शंका आली की मी मुंबईला जावे, आशाशी बोलावे यासाठी तू इतका उतावीळ का झाला आहे म्हणून मी कार कोपऱ्यावरच पार्क केली आणि तू काय करतो हे बघण्यासाठी परतली. तुझा कोट काढण्याचा त्रास मी वाचवू शकली असती पण म्हटले होऊ दे तुझे समाधान."

" हे बघ, रीटा......."

" गप्प बैस पवन आणि अजिबात हलू नकोस. हिरे माझ्याजवळ आहेत. ऐकू आले ? मला ते मिळाले. ते त्या कट्यारीच्या मुठीत होते. होय तेच पार्सल जे तू कार्पेटखाली

लपवले होते. कट्यार माझी असल्याने ती कशी उघडायची ते मला माहिती होते.”

मी कसाबसा बोललो, “ रीटा, ते आता तूच ठेव. मी तुला परत त्रास देणार नाही. मला जाऊ दे.”

“ नाही. आता तू मलाच काय कोणालाही त्रास देऊ शकणार नाही कारण आता तू पण राकेश बरोबर विहिरीच्या तळाशी जाणार आहेस. मी फक्त त्याकरताच परत आली आहे. तू जर ती कट्यार तुझ्याजवळ ठेवली नसती तर मी तुला काही केले नसते. राकेशने तोच धाक दाखवून मला ब्लॅकमेल केले म्हणून मी त्याला संपवले. नंतर तू पण तेच करणार होता म्हणून तुला पण संपवले पाहिजे.”

तेवढ्यात मागच्या दाराकडून बुटांचा आवाज आला. रीटाने दचकून मागे बघितले.

मी उडी मारून तिच्या हातातले रिव्हॉल्व्हर उडवले. पण तिने लपवलेली कट्यार काढली व माझ्यावर वार केला. जंगली जनावरांसारखी आम्ही झटापट केली. शेवटी मी एक जोरदार धक्का दिला त्यासरशी ती जमिनीवर पडली. ‘ रीटा, तू असेच बिपीनला मारले. आता गाठ माझ्याशी आहे !’ असे म्हणून मी तसेच तिच्यावर तुटून पडलो. पण तरी तिच्या हातात कट्यार

होतीच. शेवटी तिने जोरदार किंचाळण्याकरता तोंड उघडताच मी तिच्या गळयावर दाब दिला.

अचानक दारापाशी बुटांचा आवाज आला व कोणीतरी लाथ मारून दार उघडले.

मी रीटाला सोडून रिव्हॉल्व्हरकडे हात केला पण माझ्या हातावर मनगटावर बुटाचा पाय पड़ला.

क्षणार्धात सगळीकडे पोलीस दिसू लागले.

आम्ही दोघेही सोफ्यावर जवळजवळ बसलो होतो. दोन पोलीस आमच्या बाजूला उभे होते. एक साध्या वेशातला अधिकारी माझ्याजवळ उभा होता. आशा खिडकीत उभे राहून रडत होती.

आम्ही कोणीही चकार शब्द बोलत नव्हतो.

आम्ही ते राकेशला विहिरीतून केंव्हा बाहेर काढणार याची वाट बघत होतो. जोवर प्रेत मिळत नाही तोवर ते आमच्यावर कसलाही आरोप ठेवू शकत नव्हते म्हणून आम्ही वाट बघत होतो.

मिनिटामागे मिनिटे जात होती. घड्याळाची टिकटिक तेवढी ऐकू येत होती.


टेबलावर कट्यार पडली होती आणि तिच्या बाजूला आठ सुंदर हिरे. मी त्याच्या करता एक खून केला होता आणि आता मला त्यांच्याकडे बघणे पण नकोसे वाटत होते. आशा सतत रडत होती. कोट ओळखल्यापासून तिचे रडणे काही थांबत नव्हते.


अजून काही मिनिटे गेली. बाहेरून कोणाचातरी ओरडण्याचा आवाज ऐकू आला. साध्या वेषातला पोलीस जरा हालला. तेथे एकदम शांतता पसरली. नंतर एक पोलीस कॉन्स्टेबल आत आला. त्याचा चेहरा पांढराफटक पडला होता.

“ सर, दोन मिनिटे बाहेर येता काय?” साध्या वेशातील अधिकारी त्याच्या मागे गेला.

मला जाणीव झाली की आता सर्व काही संपले आहे.


-------***-------





## जगदिश खांदेवाले: एक उत्कृष्ट लेखक

जगदिश खांदेवाले यांची ई साहित्यवर प्रकाशित पुस्तके. बाजूच्या कव्हरवर फ़क्त एक क्लिक करताच पुस्तक उघडेल.



## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १४ वे वर्ष.

## जगदिश खांदेवाले यांचे हे पाचवे पुस्तक.

जगदिश खांदेवाले यांच्या कथा वास्तवाशी जवळिक साधणाऱ्या, मनोरंजक आणि वैविध्यपूर्ण असतात. ते लिहितात कमी. पण जे लिहितात ते सकस, जोमदार, आणि भरीव असते. त्यामुळे ते वाचकांच्या मनाची पकड घेते. त्यांच्या पुस्तकांवर असंख्य वाचकांचा प्रतिसाद येतो आणि त्यात एक गोष्ट आवर्जून सांगितली जाते. ती म्हणजे "तुमचे पुस्तक हातात घेतल्यावर पुर्ण केल्याखेरिज खाली ठेवता येत नाही". त्यांच्या पुस्तकांना भरपुर मागणी आहे. पण ते अत्यंत मेहनतीने लिहीलेली आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात.

असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर ई साहित्यवर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (२०), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३४), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(९), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय

पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(२९), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१३), अंकुश शिंगाडे(१६), आनंद देशपांडे(४), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(४) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(३), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(४), रामदास खरे(३), असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमुर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।